रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक १५१
www.ramprahar.com

◆ गुरुवार, १८ डिसेंबर २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २


## पंतप्रधान नरेंद्र मोदींना इथियोपियाचा सर्वोच्च सन्मान



**अदिस अबाबा :** पंतप्रधान नरेंद्र मोदी सध्या आफ्रिकन देशांच्या दौऱ्यावर आहेत. जागतिक पातळीवरील दूरदर्शी नेतृत्व आणि भारत-इथियोपिया भागीदारी बळकट करण्यामध्ये विलक्षण योगदान दिल्याबद्दल पंतप्रधान मोदी यांना इथियोपियाचे पंतप्रधान डॉ. अबी अहमद अली यांच्या हस्ते सर्वोच्च द ग्रेट ऑनर निशान ऑफ इथियोपिया सन्मानाने गौरवण्यात आले. हा पुरस्कार मिळवणारे मोदी पहिलेच जागतिक राष्ट्रप्रमुख आहेत, तर त्यांना मिळालेला हा २८वा परदेशी पुरस्कार आहे. इथियोपियाचे पंतप्रधान डॉ. अबीय अहमद अली यांच्यासोबत अदिस अबाबा इथे पंतप्रधान मोदी यांची विस्तृत चर्चा झाली. या भेटीत आठ करारांवर स्वाक्षऱ्या झाल्या. अदवा व्हिक्टरी मेमोरियल संग्रहालयालाही त्यांनी भेट दिली तसेच इथियोपियाच्या संसदेला संबोधित केले.

### अंतरंग


मानव-बिबट्या संघर्ष कमी करण्यासाठी उपाययोजना/२

बोरघाटात अमृतांजन पुलाला ट्रक धडकला; चालक ठार/५

आगरी सेवा संघाची हटके कबड्डी स्पर्धा/८


# जि.प., पं.स. अधिनियमात सुधारणा

## उमेदवारी अर्जाबाबत निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांचा निर्णय फायनल!

**मुंबई :** **प्रतिनिधी**

महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या अधिनियम १९६१च्या कलम १४ (२)मध्ये सुधारणा करण्यास बुधवारी (दि. १७) मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. राज्यातील जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांच्या निवडणुका वेळेत आणि कालबद्ध रितीने व्हाव्यात या दृष्टीने हा निर्णय महत्त्वपूर्ण आहे.

महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या अधिनियमातील कलम १४मध्ये पोट-कलम (२) अंतर्गत उमेदवारी अर्ज स्वीकारणाऱ्या किंवा स्वीकारण्यास



नकार देणाऱ्या निवडणूक अधिकाऱ्याच्या निर्णयाविरुद्ध जिल्हा न्यायालयासमोर अपील दाखल करता येत होते, मात्र विविध जिल्हा न्यायालयांमध्ये वेगवेगळ्या कालावधीसाठी अशी अनेक अपीले प्रलंबित राहत असल्याने निवडणुका कालबद्धरित्या घेणे शक्य होत नाही. त्यामुळे राज्य निवडणूक आयोगाने शासनास या तरतुदी वगळण्याबाबतचा प्रस्ताव शासनास पाठविला आहे.

या अनुषंगाने राज्य शासनास अशा निवडणुकांबाबत नियम करता येतील तसेच उमेदवारी अर्ज स्वीकारणाऱ्या किंवा स्वीकारण्यास नकार देणाऱ्या निवडणूक निर्णय अधिकाऱ्याचा निर्णय अंतिम असेल, अशी कलमे यात समाविष्ट करण्यात आली आहे. याबाबत महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या (सुधारणा) अध्यादेश २०२५ काढण्यास बैठकीत मंजुरी देण्यात आली.

## संरक्षित स्मारक परिसरातील अतिक्रमणे रोखण्यासाठी समिती

राज्यातील गड-किल्ल्यांप्रमाणेच राज्य संरक्षित स्मारकांच्या ठिकाणांवरील अतिक्रमणे रोखण्यासाठी सांस्कृतिक कार्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. या निर्णयानुसार सांस्कृतिक कार्य विभागाच्या यापूर्वीच्या (२० जानेवारी २०२५) शासन निर्णयातील गड-किल्ल्यांवरील अतिक्रमणे काढण्याबाबतच्या तरतूदींची व्याप्ती वाढविण्यात आली आहे. यामध्ये आता राज्य संरक्षित स्मारकांचाही समावेश करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. जिल्ह्यातील गड-किल्ले व राज्य संरक्षित स्मारकांवरील अतिक्रमणे रोखणे व ती काढून टाकण्याची कारवाई संबंधित जिल्हाधिकारी यांना त्या-त्या जमिनीच्या मालकीच्या विभागाच्या समन्वयाने करावी लागणार आहे तसेच यासाठीचा खर्च जिल्हा नियोजन व विकास निधीमधून करता येईल.

## १ जानेवारीपासून सीएनजी, आणि पीएनजी होणार स्वस्त

### मोदी सरकारची नववर्षानिमित्त भेट

**नवी दिल्ली :** **वृत्तसंस्था**

केंद्रातील मोदी सरकारने सीएनजी आणि घरगुती पीएनजीच्या दरात कपात करण्याची तयारी पूर्ण केली आहे. पेट्रोलियम आणि नॅचरल गॅस रेग्युलेटरी बोर्डाने (पीएनजीआरबी) गॅस वाहतुकीच्या शुल्कात मोठी कपात जाहीर केली असून याचे नवे दर १ जानेवारी २०२६पासून लागू होणार आहेत.

पीएनजीआरबीने घेतलेल्या निर्णयामुळे गॅस वाहतुकीसाठी आता युनिफाइड टॅरिफ प्रणाली लागू केली जाईल. यामुळे



वाहतुकीचा खर्च कमी होऊन थेट ग्राहकांना फायदा मिळणार आहे. सीएनजी प्रति किलो १.२५ ते २.५० रुपये स्वस्त होण्याची शक्यता आहे, तर पीएनजी घरगुती वापराच्या पाईप गॅसच्या दरात प्रति युनिट ०.९० ते १.८० रुपयांची कपात होऊ शकते.

## श्रीवर्धनमध्ये पर्यटकांच्या थार गाडीने घेतला दुचाकीस्वाराचा बळी; वातावरण तंग

**श्रीवर्धन :** **बातमीदार, प्रतिनिधी**

श्रीवर्धन शहरात बुधवारी (दि. १७) सायंकाळी घडलेल्या एका गंभीर रस्ता अपघातात दुचाकीस्वाराचा मृत्यू झाला. यानंतर संतप्त जमावाने शहरातील वाणी परिसरात मार्ग रोखून धरण्याचा प्रयत्न केला गेला, परंतु पोलीस प्रशासनाने परिस्थिती नियंत्रणात आणली.

परवेज हमदुले (ता. श्रीवर्धन) असे या अपघातात मृत्यू झालेल्या दुचाकीस्वाराचे नाव आहे. मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार हमदुले हे मोटरसायकलवरून घरी जात



होते, तर पर्यटकांची थार गाडी शहरातून समुद्रकिनाऱ्याकडे जात होती. या वेळी चारचाकी व दुचाकीचा भीषण अपघात झाला. धडकेची तीव्रता इतकी होती की, दुचाकी दूर फेकली गेली.

अपघातानंतर स्थानिक नागरिकांनी तत्काळ मदतकार्य करत जखमी परवेज हमदुले यांना उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले, मात्र डॉक्टरांनी तपासणीनंतर त्यांना मृत घोषित केले. या घटनेनंतर रुग्णालय परिसरात नागरिकांची गर्दी जमली. पोलिसांनी तातडीने या घटनेची दखल घेत थार गाडीतील सर्व युवकांना पोलीस ठाण्यात नेले आणि अपघातस्थळी मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त तैनात केला. परिस्थिती चिघळू नये म्हणून माणगाव, म्हसळा व दिघी येथून अतिरिक्त पोलीस फौज मागवण्यात आली. या अपघाताचा अधिक तपास सुरू आहे.

## वाल्मिक कराडचा जामीन फेटाळला

**छत्रपती संभाजीनगर :** **प्रतिनिधी**


बीडमधील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख खून खटल्यातील मुख्य आरोपी वाल्मिक कराड याचा जामीन अर्ज मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठाने बुधवारी (दि. १७) फेटाळून लावला.

न्यायमूर्ती सुशील घोडेस्वार यांनी कराड याला जामीन नाकारत त्याला तुर्त दिलासा देण्यास स्पष्ट नकार दिला. या निकालानंतर आता बीडच्या विशेष न्यायालयात १९ डिसेंबर रोजी या प्रकरणातील दोष निश्चितीची प्रक्रिया पार पडणार असून कराडचा कारागृहातील मुक्काम लांबला आहे.

## ‘रायगडात महानगर गॅसचे जाळे’

**पेण :** **प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात २०१५मध्ये महानगर गॅस लि. कंपनीला वायू वितरण नेटवर्क विकसित करण्याचे आदेश मिळाले, तेव्हापासून युद्धपातळीवर काम चालू आहे. येत्या सहा महिन्यांत जिल्ह्यामध्ये महानगर गॅसचे जाळे पसरणार असल्याची माहिती महानगर गॅसचे ऑपरेशन्स आणि मेटनन्स विभागाचे महाव्यवस्थापक सितांशुरॉय चौधरी यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.



या पत्रकार परिषदेस महानगर गॅस लि.चे वरिष्ठ उपाध्यक्ष गुरविंदर सिंग, प्रकल्प सहाय्यक उपाध्यक्ष विवेक सोनार, प्रताप आयरेकर, कॉर्पोरेट कम्युनिकेशन व्यवस्थापक नीरा अस्थाना-फाटे आदी उपस्थित होते.

रायगड जिल्ह्यात महानगर गॅसचे सावरोली येथे सिटीगेट स्टेशन असून त्यामार्फत जिल्ह्यात वायू वितरण केले जात आहे, जे दोन प्रकारचे आहे. एक म्हणजे स्वयंपाकासाठी वायू वितरण आणि दुसरे वाहनांसाठी वायू वितरण. जिल्ह्यात श्रीवर्धन, तळा, मुरूड वगळता सर्व तालुक्यांमध्ये वायू वितरण सुरू असून मार्च २०२६पर्यंत सर्व ठिकाणी महानगर गॅसचे जाळे विणले जाईल.

रसायनी, खालापूर, खोपोली, उरण येथे स्टील पाईपच्या सहाय्याने ऑनलाईन वायू वितरण केले जात असून पेण, अलिबाग आणि माणगाव या तालुक्यांमध्ये पाईपलाईन टाकण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. ते मार्च २०२६पर्यंत पूर्ण होईल. भविष्यात पोलादपूर, महाड या तालुक्यांना जोडण्याचा कंपनीचा मानस आहे, असे सांगण्यात आले.

### निवडक

**मंत्री कोकाटेंची खाती काढून घेतली**

**मुंबई :** सन १९९५मधील सदनिका घोटाळा प्रकरणात नाशिकच्या प्रथम दंडाधिकारी न्यायालयाने अटक वॉरंट जारी केल्याने अटकेची टांगती तलवार असलेले राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते आणि राज्याचे क्रीडामंत्री माणिकराव कोकाटे यांची सर्व खाती बुधवारी (दि. १७) काढून घेण्यात आली. त्यांच्या खात्यांचा पदभार उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे सोपविण्यात आल्याचे सांगितले जात आहे.

**होमबाऊंड चित्रपट ‘ऑस्कर’ शर्यतीत**

**नवी दिल्ली :** ऑस्कर २०२६ अर्थात ९८व्या अकॅडेमी पारितोषिकांसाठीच्या अंतिम फेरीत होमबाऊंड हा भारतीय चित्रपट प्राथमिक फेरी पार करून निवडक १५ चित्रपटांच्या यादीत पोहचला आहे. नीरज घायवान दिग्दर्शित हा चित्रपट आंतरराष्ट्रीय श्रेणीत असून या यादीतील चित्रपटांचे अंतिम नामांकन २२ जानेवारीला, तर अकादमी पुरस्कार सोहळा १५ मार्च रोजी आहे.

## मुंबईमध्ये आज जेन झी टपाल कार्यालय होणार सुरू

**मुंबई :** **प्रतिनिधी**

अद्ययावत सुविधा देणारे महाराष्ट्रातील पहिले जेन झी टपाल कार्यालय मुंबईत सुरू होत असून आयआयटी परिसरात गुरुवारी (दि. १८) या कार्यालयाचे सकाळी ११ वाजता उद्घाटन होणार आहे.

जेन झी अर्थात तरुण पिढीला टपाल सेवेकडे आकर्षित करण्यासाठी जेन झी टपाल कार्यालयाची संकल्पना देशभरात राबवली जात आहे. दिल्ली, केरळ, बिहार, गुजरात आणि आंध्र प्रदेशात हा प्रयोग यशस्वी झाल्यानंतर आता मुंबईत कार्यालय सुरू होत आहे. मोफत वाय-फाय, कॅफेटेरिया, वाचनालय, संगीत कक्ष या सुविधांनी सुसज्ज असलेल्या या कार्यालयात डिजिटल, क्यूआर आधारित सेवा वितरण, आधार नोंदणी आणि अद्ययावत करण्याची सोय तसेच विद्यार्थ्यांसाठी विशेष सवलती दिल्या जाणार आहेत. स्पीड पोस्ट सेवांवर १० टक्के सवलत, तर मोठ्या प्रमाणात पार्सल पाठवणाऱ्या ग्राहकांना पाच टक्के सवलत दिली जाणार आहे.

परंपरा आणि आधुनिक तंत्रज्ञानाची सांगड घालून टपाल कार्यालयाला एक सामुदायिक केंद्र म्हणून ओळख निर्माण करणे हा यामागील हेतू आहे. महाराष्ट्र आणि गोवा परिमंडळाचे मुख्य पोस्टमास्टर जनरल अमिताभ सिंह आणि भारतीय टपाल सेवेच्या टपाल सेवा संचालक केया अरोरा यांच्या हस्ते, आयआयटी मुंबईच्या कुलसचिवांच्या उपस्थितीत टपाल कार्यालयाचे उद्घाटन होणार आहे.



**पनवेल :** **येथील पनवेल तालुका पत्रकार संघर्ष समितीची कार्यकारिणी निवडणूक नुकतीच पार पडली. या निवडणुकीत निलेश सोनावणे यांची आठव्यांदा अध्यक्षपदी, तर सचिवपदी संतोष आमले, कार्याध्यक्षपदी अण्णा आहेर, खजिनदारपदी राजेंद्र कांबळे व उपाध्यक्षपदी तुळशीराम बोरीले यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांनी माजी खासदार रामशेठ ठाकूर यांची सदिच्छा भेट घेऊन आशीर्वाद घेतले. त्यांनी सर्वांना शुभेच्छा देत समितीला सहकार्य कायम राहिल, असे सांगितले.**

## दिल्लीत प्रदूषणामुळे निम्म्या ठिकाणी वर्क फ्रॉम होम!

**नवी दिल्ली :** **वृत्तसंस्था**

देशाची राजधानी दिल्ली व परिसरातील प्रदूषणाने धोक्याची पातळी ओलांडली आहे. त्यामुळे तेथील सरकारने सर्व सरकारी आणि खासगी आस्थापनांमध्ये गुरुवार (दि. १८)पासून ५० टक्के वर्क फ्रॉम होम बंधनकारक केले आहे.

रस्त्यांवरील वाहनांची संख्या घटवून पर्यायाने प्रदुषणाचा स्तर कमी करण्यासाठी दिल्ली सरकारने हा निर्णय घेतला आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या आस्थापनांना मोठा आर्थिक दंड केला जाणार असल्याचेही सरकारने स्पष्ट केले आहे.

दिल्लीतील वाढत्या प्रदुषणाच्या पार्श्वभूमीवर सरकारकडून मागील काही दिवसांपासून विविध उपाययोजना केल्या जात आहेत. बांधकामांवर यापूर्वीच बंधने घालण्यात आली आहेत.




# ‘मानव-बिबट्या संघर्ष कमी करण्यासाठी उपायोजना; नागरिकांचे सहकार्य आवश्यक’

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

वन्य प्राण्यांचा हल्ला होवू नये, याकरिता नागरिकांना सतत जागरुक केले जात आहे. या सर्व उपाययोजना जिल्ह्यातील वन विभाग आणि स्थानिक पोलीस प्रशासन, संयुक्त वनव्यवस्थापन समित्या, महसूल, आरोग्य विभाग, ग्रामपंचायत आणि स्थानिक नागरिक यांच्याशी समन्वय ठेवून, सहकार्याने प्रभावीपणे राबविण्यात येत आहेत. तरी या सर्व प्रक्रियेत मानव-बिबटया संघर्ष कमी करण्यासाठी नागरिकांनी प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी आज येथे केले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या राजस्व सभागृहात आयोजित रायगड जिल्ह्यातील बिबटयाचा वाढता उपद्रव व त्याबाबत करावयाच्या उपाययोजनांबाबत बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस जिल्हा पोलीस अधीक्षक आचल दलाल (दृरदूश्यप्रणालीद्वारे), उप वनसंरक्षक अलिबाग राहुल पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के, प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा प्रियदर्शनी मोरे, उप वनसंरक्षक रोहा डॉ.शैलेंद्रकुमार जाधव हे उपस्थित होते. तर कांदळवन विभागाच्या विभागीय वनअधिकारी कांचन पवार या दृरदूश्यप्रणालीद्वारे उपस्थित होत्या.

मानव-बिबटचा संघर्ष कमी करण्यासाठी जिल्ह्यातील वन विभागांकडून विविध प्रतिबंधात्मक आणि संरक्षणात्मक उपाययोजना राबविण्याबाबतच्या सूचना संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांना देत जिल्हाधिकारी किशन जावळे म्हणाले की, बिबट्याच्या उपस्थितीबाबत माहिती प्राप्त होताच विशेष बचाव पथकांची नियुक्ती करणे, पिंजरे उभारणे, संवेदनशील भागांत गस्त घालणे, जनजागृती कार्यक्रम आयोजित करणे, शाळा व ग्रामस्तरावर मार्गदर्शन करणे, निरीक्षणासाठी ट्रॅप कॅमेराचा वापर करणे तसेच आपत्कालीन परिस्थितीत तात्काळ प्रतिसाद देण्यासाठी विशेष बचाव पथक कार्यरत ठेवणे आदि सूचनाही संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांना श्री.जावळे यांनी दिल्या. मानव-वन्यजीव संघर्षप्रवण क्षेत्रांची ओळख, वर्गीकरण व नकाशीकरण करून, पगमार्क, नियमित गस्त व विशेष दक्षता याद्वारे निरीक्षण व माहिती संकलन करणे, संघर्षप्रवण गावांमध्ये सूचना फलक लावणे, लहान मुले, वृद्ध व महिलांच्या सुरक्षिततेबाबत विशेष सूचना देणे, जनजागृती व स्थानिक सहभाग वाढविण्यावर भर, ग्रामस्थांना सुरक्षित वर्तन, काळजी व प्रतिबंधात्मक उपायांबाबतचा सविस्तर आढावा त्यांनी यावेळी घेतला.

सन-२००७ मधील महत्वाच्या तरतूदीनुसार मानव वन्यजीव संघर्षामुळे उद्भवणाऱ्या मानवी मृत्यू, गंभीर दुखापत, घरांचे नुकसान तसेच पिकांचे नुकसान या बाबींसाठी तात्काळ पंचनामा करुन नुकसान भरपाई देण्याबाबत निर्देश देण्यात आले. तसेच मानव वन्यजीव संघर्ष प्रवणक्षेत्रामध्ये तातडीची कार्यवाही करण्यासाठी जलद प्रतिसाद पथके (आरआरटी) स्थापन करुन त्यासाठी आवश्यक साहित्याच्या मागणीकरिता तात्काळ प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.या बैठकीला विविध तालुक्यातील वनक्षेत्रपाल तसेच विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

## करंजाडेत महिलांसाठी लाठी काठी स्पर्धा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



शिव प्रतिष्ठान करंजाडे व शिव मावळे यांच्या संकल्पनेतून करंजाडे मधील महिलांसाठी लाठी काठी स्पर्धा ठेवण्यात आली होती. या स्पर्धा मोठ्या आनंदमय वातावरणात संपन्न झाल्या.ह्या स्पर्धेत मोठ्या प्रमाणात महिला आणि मुलींनी सहभाग घेतला होता.

शिव प्रतिष्ठान व शिव मावळे प्रतिष्ठान स्थापन करण्यामागील हेतू हा समाजातील महिलांनी स्वतःच रक्षण स्वतः कसे करावे हे ह्यातून साध्य करण्यात आले. ह्या कार्यक्रमाला शिव प्रतिष्ठान अध्यक्ष सत्यजित पाटील,सुनील अंबावडे, संदीप पाटील, अविनाश ठोसर, राकेश कुसळे, सुरेश बार्वे, अमर कुसळे, पवार सर , रोहन शिर्के, शंतनू कदम, दिपक चौधरी, आनंद पुजारी, अथर्व घाडगे, ओंकार आदी मान्यवर उपस्थित होते.

या वेळेस सत्यजित पाटील यांनी सांगितले कि करंजाडे मधील महिलांना लाठी काठी प्रक्षिक्षण देऊन स्वतःच रक्षण कसे करता येईन तसेच जर कोणी महिलांसोबत असभ्य वर्तन करेल तर शिव मावळे त्याचा चौरंग करतील.असे सांगत सत्यजित पाटील यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. दिवसेंदिवस दररोज मुंबई, पुणे यासारख्या शहरातून दररोज ३ ते ४ मुली गायब होत आहेत. अनेक मुलींवर, महिलांवर अन्याय केला जात आहे. त्या पार्श्वभूमीवर लहान मुली व महिलांवर होणाऱ्या अन्यायाला, अत्याचारला विरोध करण्यासाठी मुलींना व महिलांना आत्मनिर्भर व सक्षम बनविण्याच्या दृष्टीकोणातून मुलींसाठी व महिलांसाठी आयोजित केलेल्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## आमदार विक्रांत पाटील यांनी सादर केला कामगिरीचा आढावा

**पनवेल : वार्ताहर**



विधान परिषदेमधील आमदार विक्रांत पाटील यांनी त्यांच्या वर्षाभराच्या कालावधीत अर्थसंकल्प अधिवेशन पावसाळी अधिवेशन व हिवाळी अधिवेशन या कालावधीमध्ये केलेल्या लोकप्रमुख कामगिरीचा आढावा घेण्यासाठी पनवेल मधील पीस पार्क हॉटेलमध्ये पत्रकार परिषदेचे आयोजन केले होते.

या वेळी आमदार विक्रांत पाटील यांच्यासह माजी कोकण म्हाडा सभापती बाळासाहेब पाटील, प्रदेश कार्यकारणी सदस्य सुभाष कदम, प्रशांत कदम, तानाजी खंडागळे उपस्थित होते.

विक्रांत पाटील यांनी पनवेल तालुका व महानगर क्षेत्रातील समाजभिमुख व लोकांशी निगडित असलेले प्रश्न जनतेच्या जिव्हाळ्या बाबत असणारे पाणी,रस्ते, वीज, नयना बाधित प्रकल्प, पनवेलच्या सर्वसामान्यांचा जिव्हाळ्याचा असलेला एसटी बस डेपोच्या विकासाचा प्रश्न,सिडकोशी संबंधित असणारे विविध अनेक वर्षापासून प्रलंबित प्रश्न हे त्यांनी विधान परिषदेमध्ये मांडले.

पनवेलकरांना भेडसावणाऱ्या पाण्याचा प्रश्न हा ही सुटलेला असल्याचे त्यांनी सांगितले आहे. सिडकोच्या परिवहन विभागामध्ये काम करत असलेल्या कामगारांना तब्बल १५७ कोटी रुपयांची देणी देण्यास सुरुवात झाली आहे. सिडको ने बांधलेल्या घरांच्या किमती ह्या दहा टक्क्याने कमी करण्यास त्यांनी सरकारला निर्णय घेणे भाग पडले आहे. त्याचाही परिणाम यांनी सिडकोची घरे घेतली आहेत त्यांच्या आर्थिक जडणघडणी वरती त्याचा मूलभूत परिणाम होणार आहे.


या पत्रकार परिषदेमध्ये विचारण्यात आलेल्या प्रमुख मुद्द्यांमध्ये नवी मुंबई विमानतळाचे नामकरण कधी व कसे होणार २५ डिसेंबरला नामकरण होणार की नाही याबाबत विचारले असता ते म्हणाले की विमानतळाचे नामकरणचा ठराव हा महाराष्ट्र शासनाने करून केंद्राकडे पाठवलेला आहे.

नवी मुंबई विमानतळा प्रमाणेच अन्य विमानतळाचे नामकरणाचे प्रस्तावही केंद्रात गेलेले आहेत. याबाबत योग्य ति पूर्तता झाल्यानंतर योग्य वेळी नामकरणाचा निर्णय हा केंद्राकडून निश्चित घेतला जाईल. त्यामुळे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या नामकरणाला थोडासा विलंब होऊ शकतो, असे यावेळी त्यांनी स्पष्ट सांगितले आहे.

## आरोग्यसेवेत एआय तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्यात यावा -मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

### सार्वजनिक आरोग्य विभागाची आढावा बैठक

**मुंबई : रामप्रहर वृत्त**



राज्यातील सार्वजनिक आरोग्य सेवा अधिक सक्षम, वेगवान आणि लोकाभिमुख करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय ) तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्यात यावा, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

‘वर्षा’ शासकीय निवासस्थानी पार पडलेल्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. बैठकीत ‘समग्र’ संस्थेच्या वतीने सार्वजनिक आरोग्य सेवा बळकटीकरणाबाबत सविस्तर सादरीकरण करण्यात आले. यावेळी सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले की, आधुनिक तंत्रज्ञानाचा योग्य वापर केल्यास आरोग्य सेवांची गुणवत्ता वाढेल, उपचार अधिक अचूक व वेळेत मिळतील आणि ग्रामीण तसेच दुर्गम भागातील नागरिकांपर्यंत आरोग्य सुविधा प्रभावीपणे पोहोचवता येतील.

आजच्या डिजिटल युगात आरोग्य व्यवस्थेचे डिजिटायझेशन आणि एआय आधारित उपाययोजना अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.आरोग्य संस्थांचे स्टार रेटिंग, आरोग्य सेवांचा समीक्षा अहवाल, आरोग्य हेल्पलाईन, आरोग्य कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण, तसेच सेवा गुणवत्तेचे नियमित रिव्ह्यू यांसारख्या उपक्रमांचा समावेश होता. या उपक्रमांमुळे नागरिकांचा आरोग्य सेवांवरील विश्वास अधिक दृढ होईल, असे श्री.फडणवीस यांनी नमूद केले.

बैठकीदरम्यान ‘आपले गाव, आरोग्य संपन्न गाव’ योजना, पॉलिएटिव्ह केअर, सिकलसेल आजारावरील उपचार, वैद्यकीय अधिकाऱ्यांची भरती प्रक्रिया सुलभ करणे, वैद्यकीय अधिकाऱ्यांचे मानधन वाढवणे तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियानातील कंत्राटी कर्मचाऱ्यांचे नियमित समावेशन जलद गतीने करणे याबाबत मागण्या मांडण्यात आल्या. याशिवाय आयुष संचालक, प्रशिक्षण संचालक आणि नर्सिंग क्षेत्रातील नवीन पदे निर्माण करण्याची आवश्यकताही उपस्थित अधिकाऱ्यांनी मांडली.

या सर्व बाबींवर सकारात्मक प्रतिसाद देत मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी, राज्यातील आरोग्य सेवा अधिक मजबूत करण्यासाठी शासनाकडून आवश्यक ते सर्व सहकार्य दिले जाईल, अशी ग्वाही दिली. आरोग्य क्षेत्रातील मनुष्यबळ, पायाभूत सुविधा आणि तंत्रज्ञान यांचा समन्वय साधून दीर्घकालीन सुधारणा करण्यावर शासनाचा भर राहील, असे त्यांनी स्पष्ट केले.

या बैठकीस सार्वजनिक आरोग्य विभागाचे सचिव डॉ. निपुण विनायक, सचिव ई. रवींद्रन, वैद्यकीय शिक्षण विभागाचे सचिव धीरज कुमार, मुख्यमंत्री यांचे सचिव श्रीकर परदेशी, आरोग्य सेवा आयुक्त डॉ. कादंबरी बलकवडे, आरोग्य संचालक डॉ. नितीन अंबाडेकर, समग्र संस्थेचे प्रतिनिधी गौरव गोयल तसेच सार्वजनिक आरोग्य व वैद्यकीय शिक्षण विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## किसान प्रदर्शन ठरणार आधुनिक शेतीला वरदान

**माणगाव : बातमीदार, प्रतिनिधी**



पुणे जिल्ह्यातील मोशी येथे सुरू असलेले भारतातील सर्वात मोठे किसान प्रदर्शन हे केवळ एक प्रदर्शन न राहता शेतकऱ्यांच्या भविष्यासाठी दिशादर्शक ठरत आहे. दिनांक १० डिसेंबर ते १४ डिसेंबर या कालावधीत भरविण्यात आलेल्या या भव्य कृषी प्रदर्शनात पारंपारिक शेतीकडून आधुनिक, शाश्वत आणि उत्पन्नवाढीच्या शेतीकडे वाटचाल करण्याचा अचूक मार्ग शेतकऱ्यांना दाखविण्यात येत आहे.

या प्रदर्शनाला माणगाव येथील स्वराज्य संघटनेचे संस्थापक पंकज तांबे यांनी प्रत्यक्ष भेट देत आधुनिक शेतीतील नवनवीन तंत्रज्ञान, उपकरणे व प्रयोगांची सखोल माहिती घेतली. शेतकऱ्यांच्या हितासाठी उपयोगी ठरणाऱ्या नवकल्पना, यंत्रसामग्री आणि संशोधनाधारित शेती पद्धती यांचा त्यांनी बारकाईने अभ्यास केला.

या किसान प्रदर्शनात शेतकऱ्यांना लागणारी आधुनिक शेती अवजारे, यांत्रिकीकरणासाठी आवश्यक उपकरणे, ड्रिप व स्प्रिंकलर सिंचन प्रणाली, पाणी व्यवस्थापनासाठी विविध प्रकारचे पंप व साधने, तसेच माती परीक्षणाच्या आधुनिक पद्धती यांची सविस्तर माहिती देण्यात येत आहे. उत्पादन खर्च कमी करून नफा वाढवण्यासाठी कोणती साधने आणि तंत्रज्ञान उपयुक्त ठरू शकतात, याचे प्रत्यक्ष मार्गदर्शन येथे मिळत आहे.

शेतीपूरक उद्योगांमध्ये रस असणाऱ्या तरुण-तरुणींना छोट्या उद्योगापासून मोठ्या उद्योगांपर्यंत लागणाऱ्या आधुनिक मशिनरी, नव्या तंत्रज्ञानातून विकसित करण्यात आलेली यंत्रसामग्री प्रत्यक्ष पाहण्याची व समजून घेण्याची संधी या प्रदर्शनातून मिळत आहे. कृषी उद्योजकतेकडे वळू इच्छिणाऱ्या युवकांसाठी हे प्रदर्शन प्रेरणादायी ठरत आहे.

या प्रदर्शनात कृषिविषयक बी-बियाणे, रोपे, ऊस वाटिका, तसेच विविध पिकांसाठी उपयुक्त असणाऱ्या सुधारित जाती शेतकऱ्यांना पाहायला मिळत आहेत. शेतकऱ्यांनी आपल्या शेतात नवे प्रयोग करावेत, पीक पद्धतीत बदल घडवावा आणि शाश्वत शेतीकडे वाटचाल करावी, यावर या प्रदर्शनात विशेष भर देण्यात आला आहे. याशिवाय गांडूळ खत निर्मिती, शेततळ्यासाठी आवश्यक ताडपत्री, आधुनिक प्लास्टिक कल्चर, संरक्षित शेती (ग्रीन हाऊस, शेडनेट) यांचा शेतीमध्ये कसा प्रभावी उपयोग करता येतो, सौरऊर्जे वर चालणारी उपकरणे, सोलार कीटकनाशक फवारणी यंत्रणा, अशा अनेक उपयुक्त विषयांवर मार्गदर्शन करण्यात येत आहे.

## रायगड जिल्हा क्रीडा पुरस्कारासाठी इच्छुकांनी अर्ज सादर करावेत

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

क्रीडा व युवक सेवा संचालनालयामार्फत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय रायगड द्वारा जिल्ह्यातील उत्कृष्ट क्रीडापटू एक महिला व एक पुरुष, एक दिव्यांग खेळाडू, एक गुणवंत क्रीडा मार्गदर्शक यांच्या कार्याचे योगदानाचे मूल्यमापन होऊन त्यांचा गौरव व्हावा व क्रीडा क्षेत्रास प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने जिल्हा क्रीडा पुरस्कार सन २००२ पासून देण्यात येत आहे. रायगड जिल्ह्यातील उत्कृष्ट खेळाडू, मार्गदर्शक, उत्कृष्ट दिव्यांग खेळाडू यांना हा पुरस्कार २६ जानेवारी २०२६ रोजी देण्यात येणार आहे. त्यानुषंगाने सन २०२३-२०२४ व सन २०२४-२०२५ या वर्षाचे पुरस्कार वितरणासाठी या कार्यालयामार्फत अर्ज मागविण्यात येत असून इच्छुकांनी अर्ज सादर करावेत, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी प्रकाश वाघ यांनी केले आहे.

या पुरस्कारामध्ये प्रत्येक विजेत्याला रु.१० हजार रोख, प्रमाणपत्र आणि सन्मानचिन्ह असे बक्षिस दिले जाणार आहे. सन २०२३-२०२४ या वर्षाचे पुरस्काराकरिता दि.०१ जुलै २०१९ ते दि.३० जून २०२४ पर्यंतचे कामगिरी तर सन २०२४-२०२५ या वर्षाचे पुरस्काराकरिता ०१ जुलै २०२० ते ३० जून २०२५ पर्यंतची कामगिरी ग्राह्य धरले जातील.

पुरस्काराचे निकष पुढील - गुणवंत खेळाडू : या पुरस्कारांतर्गत पुरस्काराचे वितरण करण्यात येणार असून एक महिला खेळाडू, एक पुरुष खेळाडू व एक दिव्यांग खेळाडू यांना हा पुरस्कार देण्यात येणार आहे. संबंधित जिल्ह्यामध्ये खेळाडूंनी लगतपूर्व पाच वर्षांपैकी दोन वर्षे त्या जिल्ह्याचे (रायगड जिल्ह्याचे) मान्यता प्राप्त खेळाच्या अधिकृत स्पर्धेमध्ये प्रतिनिधित्व केलेले असले पाहिजे. खेळाडूने मान्यता प्राप्त खेळाच्या अधिकृत राज्य, राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धा मधील पुरस्कार वर्षाच्या राज्य व राष्ट्रीय स्तरावरील वरिष्ठ गटामध्ये, शालेय मधील राष्ट्रीय स्तरावरील कामगिरी लक्षात घेण्यात येईल. यापैकी उत्कृष्ट ठरणाऱ्या तीन वर्षाच्या कामगिरीचा विचार करण्यात येईल. खेळाडूने त्यांचे अर्ज विहित नमुन्यात व विहित मुदतीत दि.३० डिसेंबर पर्यंत सादर करावेत. खेळाडूच्या वतीने सादर करण्यात येणाऱ्या अर्जासोबत स्पर्धेचे मूळ प्रमाणपत्रांच्या छायांकित प्रती सादर करणे आवश्यक आहे.


## दुखवटा

### गोपिनाथ शेडगे



**पनवेल :** दिघाटी येथिल गोपिनाथ बुगाजी शेडगे यांचे ११ डिसेंबर रोजी अल्पशा आजाराने निधन झाले त्यांचा दशक्रिया विधी शनिवार २० डिसेंबर रोजी हरीहरेश्वर येथे होणार आहे. तेरावा विधी मंगळावार २३ डिसेंबर रोजी दिघाटी येथे रहात्या घरी होणार आहे

### लक्ष्मीबाई महाडिक



**नागोठणे :** रोहाजवळील धामणसई गावच्या रहिवासी आणि पंचक्रोशीत सर्वत्र भक्तीन या नावाने परिचित असलेल्या लक्ष्मीबाई पांडुरंग महाडिक (वय १०३) यांचे नुकतेच निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन विवाहित मुलगे नंदकुमार, मधुकर, सुना, मुलगी योगिता यशवंत तटकरे, जावई, नातवंडे, पातवंडे यांच्यासह मोठा परिवार आहे.

### शमीबाई ठाकूर



**नवी मुंबई :** नेरुळगावचे माजी सरपंच मधुकर पांडुरंग ठाकूर यांच्या पत्नी शमीबाई ठाकूर ( ८५ ) यांचे मंगळवारी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, ३ मुले, १ मुलगी, नातवंडे, पंतवंडे असा मोठा परिवार आहे.

## शिरवणे विद्यालयात एनएक्सप्लोरर्स सेंटर ऑफ एक्सलन्स लॅबचे उद्घाटन



**नवी मुंबई : बातमीदार**

शिरवणे विद्यालय आणि ज्युनिअर कॉलेज, नेरूळ येथे लर्निंग लिंक्स फाउंडेशनद्वारे शेल एनएक्सप्लोरर्स सेंटर ऑफ एक्सलन्स लॅबचे उद्घाटन करण्यात आले. शिरवणे विद्यालय आणि ज्युनिअर कॉलेज यांनी सादर केलेल्या प्रकल्पाला आयआयटी बॉम्बे टेकफेस्ट - आशियातील सर्वात मोठा तंत्रज्ञान महोत्सव येथे द्वितीय क्रमांक मिळाला. या यशाच्या परिणामी संस्थेमध्ये अत्याधुनिक एनएक्सप्लोरर्स लॅब स्थापन करण्यात आली आहे.

येथिल लॅब चे उद्घाटन बी जी ई पी आय एल आणि जीएम शेल इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक निपुण प्रधान व शिरवणे विद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष व भाजपा नवी मुंबई जिल्हाध्यक्ष डॉ. राजेश पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी कार्पोरेट रिलेशन्स पॉलिसी आणि गव्हर्नमेंट रिलेशन्स इंटिग्रेटेड आणि शेल एनर्जीचे विकास तुलसीयान, लर्निंग लिंक्स फाउंडेशनच्या पार्टनर सौ दीपिका शर्मा, शिरवणे विद्यालय आणि ज्युनियर कॉलेजच्या प्राचार्या भाग्यश्री चौधरी तसेच शिक्षक आणि शालेय विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी शिरवणे विद्यालय व ज्युनियर कॉलेजचे संस्थापक अध्यक्ष डॉ. राजेश पाटील यांनी शाळेत अशाप्रकारची लॅब सेट करणं ही खूप मोठी गोष्ट आहे. शेल कंपनीच्या माध्यमातून आमच्या मुलांना नारळाच्या पाण्यापासून लेदर बनवण्याचा प्रोजेक्ट बेंगलोरला जाऊन सादर करण्याची संधी मिळाली. त्यात शिरवणे विद्यालयाच्या मुलांनी दुसरा क्रमांक पटकावला.याबद्दल त्यानी प्राचार्यांचे कौतुक केले

## निवडक

### पारगाव येथील तरुणीचे अपहरण



**पनवेल :** जवळील पारगाव येथे राहणाऱ्या १६ वर्षीय तरुणीस कोणीतरी अज्ञात इसमाने फुस लावुन पळवून नेल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. तरुणीचे नाव प्रज्ञा सतिश शिंदे असून वय १६ वर्षे चार महिने, रंग निमगोरा, अंगाने-मध्यम, उंची पाच फुट दोन इंच, डोक्याचे केस काळे व लांब, नाक सरळ, डोळे-काळे, अंगामध्ये नेसुन पिवळ्या रंगाचा पंजाबी ड्रेस, भाषा -हिंदी व मराठी भाषा बोलणारी आहे. या तरुणीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे किंवा पोलीस उपनिरीक्षक हजरत पठाण यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन आहे.

### विनोद साबळे जिल्हाप्रमुखपदी



**पनवेल :** शिवसेना मुख्य नेते एकनाथ शिंदे (उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य) यांच्या आदेशानुसार शिवसेना पक्षाच्या प्रभारी जिल्हाप्रमुखपदी विनोद सदाशिव साबळे यांची (कार्यक्षेत्र उरण विधानसभा) नियुक्ती करण्यात आली आहे. नियुक्तीचा कालावधी एक वर्षाचा असेल. सक्रीयपणे प्रचार आणि प्रसार कराल तसेच शिवसेना पक्ष वाढीसाठी आपण सर्वांना सोबत घेऊन कार्य कराल असा विश्वास शिवसेना सचिव संजय पुष्पलता भाऊराव मोरे यांनी नियुक्तीपत्र देताना व्यक्त केला आहे.

# गुन्हेगारी प्रवृत्तीत वाढ; पोलिसांना आव्हान

## आठ लाख ४० हजारांच्या दागिन्यांची चोरी

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल एसटी स्टँड परिसरात चार चाकी कार मध्ये बसले असताना अज्ञाताने आठ लाख ४० हजार रुपये किमतीचे दागिने चोरून नेल्या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात १५ डिसेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.




कृष्णा रामा ठाकूर हे विचुंबे येथे राहत असून १३ डिसेंबर रोजी पत्नीसह चिंचोटी, अलिबाग येथे नातेवाईकांचे लग्न असल्याने जाण्यासाठी ते पत्नीचे दागिने सोबत घेऊन त्यांनी कपड्याच्या बॅगमध्ये ठेवले होते. ते पनवेल बस स्टॅन्ड येथे आले.

या वेळी ते स्टॅन्डसमोर अलिबाग येथे जाणाऱ्या खासगी गाडीकडे आले. या वेळी पांढऱ्या रंगाच्या एर्टिगा कार चालकाने अलिबाग येथे जाणार असल्याचे सांगितले ते त्या गाडीत बसले, मात्र प्रवासी नसल्याने उशीर होईल असे सांगितल्याने बॅग डिकीत ठेवा असे चालकाने सांगितले. त्यांनी बॅगा डिकीत ठेवल्या. ते कारच्या सीटवर बसले. या वेळी मागच्या सीटवर एक जोडपे बसले होते. ते अलिबागच्या दिशेने निघाले. त्यांच्यासोबतची महिला कारले खिंड येथे उतरली. त्यानंतर ठाकूर आणि त्यांची पत्नी अलिबाग येथे उतरून रिक्षा पकडून राहत्या घरी चिंचोटी येथे पोहोचले. घरी पोहचल्यावर बॅगेमध्ये ठेवलेले दागिने पाहिले असता दागिने सापडून आले नाहीत.

सर्व बॅगेत दागिने शोधले, मात्र सापडले नाहीत. कारमध्ये बसल्यानंतर अज्ञाताने दागिने चोरले अशी तक्रार पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली.

## शेअर ट्रेडिंगमध्ये रक्कम गुंतवण्यास सांगून फसवणूक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शेअर्स ट्रेंडिंग मध्ये रक्कम पाठवण्यास सांगून कोणताही परतावा न देता २६ लाख ५५ हजाराची फसवणूक केल्याप्रकरणी दोन अनोळखी इसमाविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात १५ डिसेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

भरत जरीवाला हे तक्का, सेक्टर २१ येथे राहत असून त्यांनी युट्युब वर जाहिरात पाहिली आणि ते कम्युनिटीमध्ये जॉईन झाले. रक्कम गुंतवल्यास चांगला परतावा मिळेल असे सांगण्यात आल्याने त्यांनी पैसे गुंतवले. त्यानंतर व्हाट्सअप वर लिंक पाठवून प्लिकेशन डाऊनलोड करायला सांगितले. त्यांनी ते डाऊनलोड केले असता गुंतवलेली रक्कम आणि त्यात झालेला फायदा दिसत होता.

पहिल्यांदा झालेल्या फायद्यातून वीस हजार रुपये बँक अकाउंट मध्ये पाठवण्यात आले. त्यानंतर अभिषेक उमट हा त्यांना कॉल करून शेअर ट्रेडीग मध्ये पैसे कसे, कुठे गुंतवायचे याबाबत मार्गदर्शन करत होता. त्यानंतर त्यांनी एकूण २६ लाख ५५ हजार रुपये गुंतवले. जवळ पैसे नसल्याने बँक अकाउंट मध्ये रक्कम जमा करा असे सांगितले असता फायनान्स डिपार्टमेंट सोबत बोलावं लागेल असे सांगण्यात आले.

यानंतर ब्रोकरेज आणि सर्विस चार्ज म्हणून सहा लाख तेहतीस हजार रुपये भरावे लागतील असे सांगितल्याने फसवणूक झाल्याचे त्यांच्या लक्षात आले.

## डोळ्यात मिरची पावडर टाकल्याने तरुणीविरोधात गुन्हा दाखल

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

३२ वर्षीय तरुणाच्या डोळ्यात मिरची पावडर टाकल्याने तरुणीविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

हा तरुण तक्का येथे राहत असून २०२० मध्ये त्याची ओळख एका तरुणी सोबत झाली आणि त्याचे रूपांतर प्रेम संबंधात झाले. त्यांचेत वाद होत असल्याने २०२३मध्ये तरुणीने ३२ वर्षीय तरुणा वर बलात्काराचा गुन्हा दाखल केला. या गुन्ह्यात तरुण जामीनावर आहे. १४ डिसेंबर रोजी पनवेल रेल्वे स्टेशनला तो बहिणीला घेण्यासाठी मोटरसायकलवर जात होता. या वेळी पनवेल रेल्वे स्टेशनला बस डेपोच्या मागे पाण्याच्या टाकीजवळ पोहोचला असता सदरची तरुणी आणि तिचे वडील व भाऊ हे आले आणि त्या तरुणीने त्याच्या डोळ्यात आणि तोंडावर मिरची पावडर टाकली.

तो पोलीस स्टेशनला आला आणि पोलिसांनी त्याला उपजिल्हा रुग्णालय, पनवेल येथे उपचार करून पोलीस स्टेशनमध्ये आणले.

## शिक्षिकेच्या खात्यातून लाखोंची रक्कम लंपास

**पनवेल : वार्ताहर**

कामोठे परिसरात राहणाऱ्या एका शिक्षिकेच्या बँक खात्यातून सायबर चोरट्यांनी तब्बल २३ लाख ८८ हजार रुपये परस्पर लंपास केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. आरटीओ चलानच्या नावाखाली पाठवलेल्या एपीके फाइलद्वारे ही सायबर फसवणूक करण्यात आल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. याप्रकरणी कामोठे पोलिसांनी अज्ञात सायबर चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

फसवणूक झालेल्या ४५ वर्षीय शिक्षिका कामोठे सेक्टर-३४ येथे कुटुंबासह वास्तव्यास असून, त्या कळंबोली येथील एका शाळेत शिक्षिका म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या घराच्या नूतनीकरणासाठी त्यांनी बँकेतून २४ लाख रुपयांचे कर्ज घेतले होते. ही संपूर्ण रक्कम त्यांच्या बँक खात्यात जमा झाली होती, मात्र दुसऱ्याच दिवशी शाळेत जात असताना त्यांच्या मोबाईल फोनचे नेटवर्क अचानक बंद पडले. कॉल, मेसेज तसेच इंटरनेट सेवा पूर्णपणे ठप्प झाली. घरी आल्यानंतर वायफायच्या माध्यमातून इंटरनेट सुरू झाले. त्यानंतर संशय येऊन त्यांनी दुसऱ्या दिवशी सिम कार्ड बदलून घेतले, मात्र आईला पैसे पाठवण्यासाठी खात्यातील शिल्लक तपासली असता केवळ ७०५ रुपये उरल्याचे दिसून आले.

## राष्ट्रवादी पक्षाची बैठक




**पनवेल : वार्ताहर**

नुकतीच पनवेलमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची वतीने पनवेल महानगरपालिका निवडणुकीच्या तयारीसाठी कंबर कसली असून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. भारतीय जनता पक्षाबरोबर युती करून निवडणूकीत उतरण्याची प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांनी घेतला असुन तशा सूचना पक्षाच्या कार्यकर्त्यांना देण्यात आल्या आहेत.

भारतीय जनता पक्षाचे नेते आणि पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांच्याशी चर्चा करण्यासाठी माजी नगरसेवक जिल्हा समन्वयक शिवदास कांबळे व पदाधिकारी प्रयत्नशील आहेत. महाराष्ट्र राज्याच्या महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली समाजातील सर्व घटकांना सामावून घेवुन राष्ट्रवादी काँग्रेसची निवडणूक लढवणार असून महिला व युवकांना विशेष प्राधान्य देण्यात येणार आहे.

## पनवेल प्रभाग १९मध्ये विविध विकासकामांचे लोकार्पण, भूमिपूजन





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिका प्रभाग क्रमांक १९ मध्ये विविध विकास कामांचे लोकार्पण आणि भूमिपूजन सोमवारी पार पडले. यामध्ये रोहिदास वाडा येथील समाज मंदिरातील व्यायाम शाळेचे उद्घाटन भाजप नेते जयंत पगडे, माजी नगरसेवक अनिल भगत, पनवेल शहर अध्यक्ष सुमित झुंजारराव यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते झाले. या कामासाठी माजी नगरसेविका दर्शन भोईर आणि सुलोचना कल्याणकर यांनी पाठपुरावा केला होता.

या वेळी माजी नगरसेवक राजू सोनी, माजी नगरसेविका दर्शना भोईर, सूलोचना कल्याणकर, रुचिता लोंढे, पनवेल शहर अध्यक्ष सुमित झुंझारराव, बाब्या जाधव, संजय जाधव, प्रवीण मोहोकर, रजनिश जाधव, तानाजी झूगे, निलेश जाधव, निकितन लवागे, लक्ष्मण वावा, अनिल उरणकर, मिलींद उरणकर, संतोष जाधव, प्रवीण दूशमिकर, निखिल दूशमिकर, किरणं मोहोकर, बाबू आबोलकर, विजय कोळी, गोरख नवले, अतूल विधाते, निलेश विधाते, संदेश पवार, गजानन जाधव, केतन जाधव, राकेश जाधव, अंबादास परभाने, कैलास जाधव, बाबू जाधव, प्रतिक गायकवाड, दिनेश कटके, भरत नवले, निलेश कासार, सूदेश खैरे, शूभम मोहोकर, संदिप कदम यांच्यासह रहिवासी उपस्थित होते.

## भाताण ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी दीपक ठाकूर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील भाताण ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी दीपक ठाकूर यांची बिनविरोध निवड झाली आहे.

मावळत्या उपसरपंच रसिका स्वपनिल भोईर यांनी राजीनामा दिल्याने त्यांच्या रिक्त जागी उपसरपंच पदाच्या निवडीनुसार मंगळवारी (दि.१६) ग्रामपंचायत कार्यालयात सरपंच तानाजी पाटील यांच्या अध्यक्ष खाली सदस्य सदस्यांची बैठक बोलवण्यात आली होती. या वेळी उपसरपंच पदासाठी दीपक नामदेव ठाकूर यांचा निर्धारित वेळेत एकमेव अर्ज प्राप्त झाल्याने त्यांची सर्व नुमते बिनविरोध निवड करण्यात आली.

या वेळी ग्रामपंचायत सदस्य अरुण पाटील, अस्मिता काठावले, अरुण गाताडे, रजनी मुकादम, बाळाराम मुकादम, रसिका भोईर आधी उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान, दीपक ठाकूर यांची अनेकांनी भेट घेत उपसरपंचपदाबद्दल अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.



## मँगो गार्डनच्या नवीन प्रवेशद्वाराचे उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवीन पनवेल सेक्टर १४ येथील मँगो गार्डनच्या नव्याने उभारण्यात आलेल्या प्रवेशद्वाराचे उद्घाटन सोमवारी सकाळी उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. या नवीन प्रवेशद्वारामुळे बागेच्या सौंदर्यात भर पडली असून नागरिकांसाठी सुरक्षित व सुबक प्रवेशाची सोय उपलब्ध झाली आहे.

उद्घाटन समारंभप्रसंगी पनवेल नगरपालिकेचे माजी उपनगराध्यक्ष सुभाष भुजबळ प्रमुख उपस्थित होते. त्यांच्या हस्ते विधिवत पूजन करून प्रवेशद्वाराचे उद्घाटन करण्यात आले. या वेळी उद्योगपती रवींद्र कांडपिळे, विष्णू गवस, क्रांतीकुमार चितळे, सिद्धेश भुजबळ यांच्यासह परिसरातील नागरिक आणि मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.



या वेळी उपस्थित मान्यवरांनी मँगो गार्डन ही परिसरातील नागरिकांसाठी महत्त्वाची हिरवळ असून, अशा बागांचे संवर्धन आणि सौंदर्यीकरण करणे ही काळाची गरज असल्याचे मत व्यक्त केले. नव्या प्रवेशद्वारामुळे बागेला स्वतंत्र ओळख मिळणार असून सकाळी-संध्याकाळी फिरायला येणाऱ्या नागरिकांना अधिक सोयीस्कर व सुरक्षित वातावरण मिळेल, असेही या वेळी नमूद करण्यात आले. परिसरातील नागरिकांनी या उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त करत संबंधित सर्वांचे आभार मानले.

## भाजप पदाधिकाऱ्यांमुळे कामोठ्यातील 'शिवकल्पतरू'चा पाणीपुरवठा सुरळीत

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजप पदाधिकाऱ्यांच्या पाठपुराव्यामुळे कामोठे येथील शिवकल्पतरू सोसायटीतील पाणीपुरवठा सुरळीत झाला आहे. नागरिकांनी भाजप पदाधिकाऱ्यांचे आभार मानले आहेत.

कामोठे येथील सेक्टर १७ मधील शिवकल्पतरू सोसायटी, प्लॉट क्रमांक १ येथील नागरिकांना गेल्या अनेक दिवसांपासून तीव्र पाणीटंचाईला सामोरे जावे लागत होते. अपुरा पाणीपुरवठा व कमी पाणीप्रेशरमुळे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले होते.



या समस्येबाबत सोसायटीच्या पदाधिकाऱ्यांनी भाजप कामोठे मंडळाचे उपाध्यक्ष दामोदर चव्हाण यांच्याकडे तक्रार नोंदवली होती. ही बाब गांभीर्याने घेत दामोदर चव्हाण यांनी तातडीने ही समस्या कामोठे भाजपचे शहराध्यक्ष विकास घरत यांच्या निदर्शनास आणून दिली. नागरिकांच्या मूलभूत गरजांबाबत कोणतीही तडजोड न करता तत्काळ निर्णय घेण्याची भूमिका घेत विकास घरत यांनी सिडको अधिकाऱ्यांसोबत थेट संपर्क साधत सोसायटीचे पदाधिकारी व सिडको प्रशासनाची संयुक्त बैठक आयोजित केली.

या बैठकीदरम्यान पाणीटंचाईचे मूळ कारण कमी पाणीप्रेशर असल्याचे स्पष्ट झाले. यावर प्रभावी आणि कायमस्वरूपी उपाय म्हणून नवीन पाण्याचा वॉल (व्हॉल्व्ह) बसवण्याचा निर्णय घेण्यात आला. केवळ निर्णयावर न थांबता विकास घरत यांनी सातत्याने सात दिवस सिडकोकडे पाठपुरावा करत प्रत्यक्ष काम पूर्ण करून घेतले. परिणामी शिवकल्पतरू सोसायटीतील पाणीपुरवठा सुरळीत झाला असून नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. या यशस्वी आणि तत्पर कार्यवाहीबद्दल शिवकल्प तरू सोसायटीच्या वतीने कामोठे भाजपचे शहराध्यक्ष विकास घरत व उपाध्यक्ष दामोदर चव्हाण यांचे आभार मानण्यात आले.

विकास घरत यांच्या नेतृत्वाखाली परिसरातील नागरी प्रश्न सातत्याने मार्गी लावले जात असल्याची भावना या वेळी नागरिकांनी व्यक्त केली. नागरिकांच्या दैनंदिन अडचणी सोडवणे हेच आमचे प्राधान्य आहे. समस्या समजल्यावर प्रशासनाशी समन्वय साधून तातडीने उपाययोजना करणे ही आमची कार्यपद्धती आहे, असे मत या वेळी शहराध्यक्ष विकास घरत यांनी व्यक्त केले.

## लोकनेते रामशेठ ठाकूर वक्तृत्व स्पर्धेचे पारितोषिक वितरण; २३ विद्यार्थ्यांचा गौरव

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कोशिश फाऊंडेशन व पनवेल महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आमदार प्रशांत ठाकूर चषक वक्तृत्व स्पर्धा २०२५ अंतर्गत आंतरशालेय फेरीचे पारितोषिक वितरण सोहळा लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल, कामोठे तसेच लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मिडियम स्कूल, कामोठे येथे उत्साहात पार पडले.

या आंतरशालेय फेरीत विविध शाळांमधील विद्यार्थ्यांनी प्रभावी वक्तृत्व सादर केले होते. त्यामधून निवड झालेल्या एकूण २३ विद्यार्थ्यांना पारितोषिके व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. विद्यार्थ्यांनी सामाजिक, शैक्षणिक व समकालीन विषयांवर आत्मविश्वासाने विचार मांडून उपस्थितांची दाद मिळवली.

या वेळी शाळेचे मुख्याध्यापक स्वप्नाली यांनी सांगितले, आमदार प्रशांत ठाकूर चषक वक्तृत्व स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांना विचार मांडण्याचे व्यासपीठ मिळते. अशा स्पर्धांमुळे आत्मविश्वास, संवादकौशल्य आणि नेतृत्वगुण विकसित होतात. कोशिश फाऊंडेशनने घेतलेला हा पुढाकार निश्चितच कौतुकास्पद आहे. तसेच हर्षवर्धन पाटील यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करताना सांगितले कि, आज सन्मानित झालेले विद्यार्थी हे उद्याचे सक्षम वक्ते आणि जबाबदार नागरिक आहेत.

या स्पर्धेमुळे मुलांमध्ये धाडसाने बोलण्याची क्षमता निर्माण होत असून, हेच त्यांच्या उज्वल भविष्यासाठी अत्यंत आवश्यक आहे. शाळा प्रशासनाने कोशिश फाऊंडेशन आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाबद्दल आभार व्यक्त करत, विद्यार्थ्यांना मिळणारे हे व्यासपीठ त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत उपयुक्त असल्याचे नमूद केले.

या आंतरशालेय फेरीतील यशस्वी विद्यार्थ्यांना पुढील स्तरावर स्वतःची क्षमता सिद्ध करण्यासाठी मोठी प्रेरणा मिळाल्याचे वातावरणातून स्पष्ट झाले. यावेळी युवा मोर्चा कामोठे अध्यक्ष तेजस जाधव, मनोहर शिंगाडे, राहुल बुधे, अमित गोडसे यांच्यासह शिक्षक विद्यार्थी उपस्थित होते.



## संपादकीय

# ऐतिहासिक पाऊल

विमा क्षेत्रातील थेट परकीय गुंतवणुकीची मर्यादा वाढवून १०० टक्के करण्याच्या विधेयकाला बुधवारी संसदेने मंजुरी दिली. यामुळे आता परदेशी विमा कंपन्या भारतात स्वतंत्रपणे काम करू शकतील. या विधेयकाचा उद्देश विमा क्षेत्राला चालना देणे, प्रत्येकासाठी विम्याची उपलब्धता वाढवणे, अधिकाधिक लोकांना विमाछत्राखाली आणणे आणि स्पर्धेतून ग्राहकांना अधिक चांगली सेवा उपलब्ध करून देणे हा आहे.

**पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखालील केंद्रीय मंत्रिमंडळाने अलीकडेच एक मोठा निर्णय घेतला आणि विमा कंपन्यांमध्ये थेट परकीय गुंतवणुकीची मर्यादा १०० टक्क्यांपर्यंत वाढवणाऱ्या विधेयकाला मान्यता दिली. पाठोपाठ आता 'सबका बीमा सबकी रक्षा' हे विमाक्षेत्र पूर्णपणे खुले करण्यासंबंधीचे केंद्र सरकारने मांडलेले विधेयक संसदेत संमत झाले आहे. यासोबतच विमा क्षेत्राला बळकटी देण्यासाठी अनेक प्रमुख संरचनात्मक सुधारणांनाही मान्यता देण्यात आली असून या निर्णयाचे उद्दिष्ट विमा क्षेत्रात अधिक भांडवल आणणे, स्पर्धा वाढवणे आणि ग्राहकांना अधिक उत्तम सेवा उपलब्ध करून देणे हे आहे. स्पर्धा वाढल्यामुळे ग्राहकांना अधिक पर्याय व चांगले कव्हरेज उपलब्ध होऊ शकेल. या वर्षीच्या अर्थसंकल्पीय भाषणात अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी विमा उद्योगात परकीय गुंतवणुकीची मर्यादा सध्याच्या ७४ टक्क्यांवरून १०० टक्क्यांपर्यंत वाढवण्याचा प्रस्ताव मांडला होता. हा आर्थिक क्षेत्रातील प्रमुख सुधारणांचा एक भाग असून आतापर्यंत विमा उद्योगाने ८२ हजार कोटी रुपयांची थेट परकीय गुंतवणूक आकर्षित केली आहे. थेट परकीय गुंतवणुकीच्या मंजुरीमुळे विमा क्षेत्रात महत्त्वपूर्ण बदल घडतील अशी अपेक्षा आहे. या निर्णयामुळे परदेशी कंपन्या भारतात विमा व्यवसाय स्वतंत्रपणे करू शकतील. अर्थात या कंपन्यांच्या गुंतवणुकीवर भारतीय विमा नियामक प्राधिकरणाचे नियंत्रण असेल. देशातील अनेक मोठे उद्योगसमूह विमाक्षेत्रात कार्यरत आहेत. त्यांना अधिक भांडवल आकर्षित करणे यामुळे सोपे होऊ शकेल. बाजारात स्पर्धा वाढेल आणि ग्राहकांना चांगली सेवा मिळेल. परदेशी विमा कंपन्यांच्या भारतातील प्रवेशामुळे विमा हप्त्यांच्या बाबतीतही बदल अपेक्षित आहेत. वाढत्या स्पर्धेमुळे विमा कंपन्या ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी विम्याचे हप्ते परवडणारे ठेवण्याचा प्रयत्न करतील. या ऐतिहासिक निर्णयामुळे आर्थिक वाढ होऊन रोजगार निर्मितीलाही चालना मिळणार आहे. परदेशी कंपन्यांचे भरभक्कम भांडवल आणि डिजिटल प्रक्रिया करण्याच्या क्षमतेमुळे विम्याचे दावे जलद गतीने निकालात काढले जातील. तसेच ग्राहकांना कागदपत्रांच्या त्रासातून मुक्तता मिळेल. लहान शहरे आणि ग्रामीण भागातही यामुळे विमा संरक्षण उपलब्ध होऊ शकेल अशी अपेक्षा आहे. विमा क्षेत्रातील परकीय गुंतवणुकीची मर्यादा २०१५ मध्ये २६ टक्क्यांवरून ४९ टक्के केली गेली. २०२१मध्ये ती ७४ टक्के करण्यात आली आणि आता ती १०० टक्के करण्यात आली आहे. विमा क्षेत्रातील कंपन्यांची संख्या २०१४ मधील ५३ वरून आता ७४ झाली आहे असे केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी लोकसभेत सांगितले. गेल्या काही वर्षांत देशात लोकांना विम्याचा अधिक लाभ मिळावा याकरिता प्रयत्न होतो आहे. पंतप्रधान पीक विमा योजना आणि जनआरोग्य योजना यांसारख्या योजनांनी गरीबांना विम्याच्या छत्राखाली आणले आहे. देशात आयुर्विमा धारकांची संख्या आजही तशी कमी आहे. वैद्यकीय विमा धारक तर त्याहूनही कमी आहेत. नव्या बदलांमुळे हे चित्र बदलेल अशी अपेक्षा आहे. सोबतच विम्याविषयी जागरुकताही निर्माण करावी लागणार आहे.**

# तानाजी मालुसरे यांची कर्मभूमी उमरठ बदलतेय!



**खबरबात**
**शैलेश पालकर**

पोलादपूर तालुक्यात सह्याद्रीच्या कडेकपारीमध्ये वसलेले उमरठ हे गांव शिवकालीन इतिहासात 'गड आला पण सिंह गेला' हे हिंदवी स्वराज्य संस्थापक राजे शिवछत्रपती यांच्या मुखातून अजरामर झालेल्या शौर्याच्या कौतुकाचे बोल ज्या नरवीरासाठी होते. त्या तानाजी मालुसरे यांची कर्मभूमी. त्यांच्यासोबत सिंहगडावर स्वारी करून गेलेले शेलारमामा हेदेखील उमरठचेच. 'आधी लगीन कोंढाण्याचं आन् मग रायबाचं' असे स्वामीनिष्ठेचे ओतप्रोत उद्गार एक कर्तृत्वाचा ठसा उमटवून गेले. ते नरवीरांची ही कर्मभूमी तब्बल ३०-३५ वर्षे उपेक्षित अवस्थेत राहिल्यानंतर आता पुन्हा नजरेत भरण्यासारखे सृष्टी सौंदर्य घेऊन इतिहास जागविण्यास सज्ज झाली आहे.

पोलादपूर तालुक्याला भेट देणारा प्रत्येक वक्ता, राजकीय नेता, विचारवंत पोलादपूरचा उल्लेख नरवीरांची कर्मभूमी असा करतो. मात्र, पितळवाडीपासून दूर्गम होत गेलेल्या रस्त्यासारख्या दिसणाऱ्या चिखलवाटा एरव्ही उन्हाळी धूळवाटा अन् दगडवाटा असतात. एस.टी.ची गाडी येथून जाते पण कधी नादुरूस्त होईल, याची शाश्वती नसते. कापडे ते कामथे या प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेच्या रस्त्याच्या कमकुवत आणि निकृष्ट कामाचा अनुभव घेऊन झाल्यानंतर उमरठकडे जाणारा जीर्ण रस्ता दिसतो. मात्र, अशा विपरित परिस्थितीत स्थानिक रायगड जिल्हा परिषद सदस्य व शिवसेनेचे तालुकाप्रमुख चंद्रकांत कळंबे यांनी या रस्त्याच्या कामाची अंदाजपत्रकीय खर्चाची अंदाजे ७५ लक्ष रूपयांची तरतूद करण्याची मागणी केली अन् पाठपुरावाही सुरू केला. उमरठला पर्यटनक्षेत्र घोषित झाल्यानंतर पर्यटनदृष्टया विकसित करण्यासाठी ही आवश्यक बाब लक्षात घेऊन रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष पंडीतशेठ पाटील यांनी त्यांचे वडील तत्कालीन कुलाबा जिल्हा परिषदेचे अध्यक्ष प्रभाकरभाऊ पाटील यांचे प्रेम असलेल्या या भूमीमध्ये पुन्हा सौंदर्यीकरणाच्या पाठपुराव्याला सकारात्मक प्रतिसाद दिला अन् अनेक वर्षे उपेक्षित राहिलेली नरवीरांची कर्मभूमी उमरठ आता अवर्णनीय सृष्टीसौंदर्य अन् ऐतिहासिक वातावरण निर्मितीसह कौतुकाने न्याहाळण्यासारखी झाली आहे.

मात्र, ज्यांनी हे विश्रामगृह उभारण्यासाठी महत्वाची भूमिका बजावली त्या प्रभाकर पाटील यांचे सुपुत्र रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष पंडीतशेठ एवं सुभाष पाटील यांनी दिलेल्या सकारात्मक प्रतिसादामुळे उमरठच्या विश्रामगृह आणि इतर परिसराचा विकास होऊ लागला आहे. नरवीरांच्या पूर्णाकृती पुतळयाला पुष्पहार अर्पण करण्यासाठी रॅम्प आणि याठिकाणच्या जुन्यावाडयाच्या पायाबंदीवर तटबंदीसदृश्य भुईकोटच उभा करण्यासह सौंदर्यीकरण करण्यात स्थानिक जिल्हा परिषद सदस्य चंद्रकांत कळंबे यांच्यासह मुरलीधर दरेकर यांनी आ.भरतशेठ गोगावले यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वी पाठपुरावा केल्याचे दिसून येत आहे. खरं तर कोंढाणा सर करण्यासाठी उपयोगी ठरलेल्या यशवंती घोरपडीपासून, नरवीरांच्या वीरमरणानंतर भेकडासारखा पळ काढणाऱ्या सूर्याजी पिसाळांपर्यंत, शस्त्र आणि लोकजीवन असा इतिहासाचा प्रत्येक प्रसंग उमरठ येथे शिवकाळातील नरवीरसृष्टी अवतरण्यासाठी उपयुक्त आहे. या शिवकालीन पर्यटनस्थळाची आजवरची उपेक्षा थांबून उमरठ बदलतेय, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

पोलादपूर तालुक्यातील उमरठ येथे नरवीर तानाजी मालुसरे यांच्या पुतळयाच्या उभारणीचे काम सुरू असताना एका झाडाच्या खोडाच्या पोकळीमध्ये म्हणजेच ढोलीमध्ये मोठया प्रमाणात शस्त्रसाठा सापडला होता. अनेक शिवप्रेमी आणि इतिहास संशोधकांनी नरवीर तानाजी मालुसरे यांच्या पराक्रमाची आठवण म्हणून ही शस्त्रं सोबत नेली. सध्या या ठिकाणी केवळ दोनच शस्त्र उपलब्ध आहेत. नजीकच्या काळामध्ये उमरठ येथे शस्त्र संग्रहालय उभारले जाणार असल्याने ज्या इतिहासप्रेमींनी येथून शस्त्र व हत्यारं नेली आहेत त्यांनी ती परत आणावीत, असे आवाहन नरवीर तानाजी मालुसरे उत्सव समितीचे सक्रीय सदस्य रामदास कळंबे यांनी येथे केले.

नरवीर तानाजी मालुसरे यांच्या पुतळयाचे उद्घाटन महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या हस्ते तसेच कुलाबा जिल्हा परिषदेचे पहिले अध्यक्ष के.गो. तथा दादासाहेब लिमये यांच्या उपस्थितीत १६ एप्रिल १९६५ रोजी लोकार्पण करण्यात आले. हा नरवीर तानाजी मालुसरे यांचा पुतळा उभारणीच्या कामाची सुरुवात झाली असताना येथील एका जुनाट ३५० ते ४०० वर्षाच्या महाकाय आंब्याच्या वृक्षाची फांदी तुटली. यावेळी या झाडाच्या खोडातील पोकळी दिसून आली. या पोकळीमध्ये मोठया प्रमाणात शिवकालीन शस्त्रसाठा आढळून आला होता. हा शस्त्रसाठा मिळाल्याची माहिती उद्घाटन सोहळयावेळी चर्चेत आल्यानंतर तत्कालीन उद्घाटन सोहळयाच्या बातम्या प्रसिध्द करणाऱ्या वृत्तपत्रांनी हा शस्त्रसाठा मिळाल्याचा उल्लेख बातम्यांमध्ये केला होता. परिणामी, अनेक इतिहास संशोधक आणि शिवप्रेमी उमरठ येथे आले आणि त्यांनी शस्त्र जतन करण्याच्या निमित्ताने तसेच पॉलिश करण्याच्या बहाण्याने उमरठ येथून आप-आपल्या गावी यातील काही शस्त्रे नेली. उमरठ गावातील प्रत्येक घरामध्ये हत्यारं मोठया संख्येने वारसांनी सांभाळून ठेवली होती. ही हत्यारं पुणे येथील केळकर म्युझियम तसेच शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांच्याकडे येथे मोठया संख्येने असून पुणे शहरात व अन्यत्र देखील उमरठ येथील हत्यारं अनेक शिवप्रेमी इतिहासप्रेमी तसेच नरवीरप्रेमी यांनी येथून नेली आहेत. उमरठ हे पर्यटन स्थळ क वर्गातून अ वर्गात आणण्याची प्रक्रिया सुरू झाली असून सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत याठिकाणी शस्त्र संग्रहालय बांधण्याचेही आराखडयामध्ये निश्चित करण्यात आले आहे.

अगदी गेल्या काही वर्षापर्यंत भाला, बर्ची, दांडपट्टा आणि तलवार अशी चार शस्त्रे येथे पर्यटकांना फोटो काढण्याच्या निमित्ताने उपलब्ध होत असत. मात्र, गंजलेला भाला आणि बर्ची ही हत्यारे काळाच्या ओघात गंजून नष्ट पावली. सध्या केवळ तलवार आणि दांडपट्टा ही दोन शस्त्रे पाहण्यात मिळत आहेत. यापैकी एका दांडपट्टयाची माहिती देताना रामदास कळंबे यांनी हे शस्त्र नरवीर तानाजी मालुसरे यांनी वापरले असून शंभरहून अधिक शत्रूसैन्य मारल्यानंतरची खूण या तलवारीला दिसून येते. अशी माहिती यावेळी रामदास कळंबे यांनी दिली.

माजी मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांनी ५ कोटींच्या सौंदर्यीकरणाचे उदघाटन केल्यानंतर विद्यमान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री पदावरून दिलेल्या ५ कोटींच्या निधीतील कामांचे लोकार्पण ऑनलाईन करताना आणखी १० कोटींचा निधी देण्याचा शब्द दिला. त्यासाठी मंत्री भरतशेठ गोगावले यांनी पाठपुरावा केला असून आता या निधितून नरवीर तानाजी मालुसरे यांचा ऐतिहासिक वाडा आणि शस्त्र संग्रहालय, कातीव दगडांच्या तटबंदीसह नरवीर तानाजी मालुसरे आणि शेलारमामांची समाधी, नरवीर तानाजी मालुसरे यांचा महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या हस्ते तसेच कुलाबा जिल्हा परिषदेचे पहिले अध्यक्ष के.गो. तथा दादासाहेब लिमये यांच्या उपस्थितीत १६ एप्रिल १९६५ रोजी लोकार्पण झालेल्या नरवीरांच्या पुतळयाच्या ठिकाणी नवीन पुतळयासह नरवीरांच्या जीवनातील विविध ऐतिहासिक प्रसंगांपासून मृत्यूपर्यंतच्या घटनाक्रमांची धातूशिल्पांची नरवीर सृष्टी याठिकाणी साकारण्यात येणार असून त्याकामी अभिनव कला महाविद्यालय पुणेचे तज्ज्ञ आर्किटेक्चर प्रा.परदेशी यांच्या मार्गदर्शनाखाली काम सुरू होणार आहे. १००कोटींच्या या सौदर्यीकरणाच्या नियोजित प्रकल्पामुळे उमरठचा पर्यटनविकास होण्याची खात्री पटू लागली असून उमरठ बदलतेय हे निश्चित झाले आहे.



## बदलते तंत्रज्ञान

### ग्लोबल नेव्हिगेशन सॅटेलाइट सिस्टीम

जेव्हा आपण एका राज्यातून दुसऱ्या राज्यात जातो तेव्हा आपल्याला टॅक्स भरावा लागतो. यासाठी राष्ट्रीय महामार्गांवर अनेक टोलनाके बांधले जातात जिथे टोल टॅक्स वसूल केला जातो. मात्र आजही टोलनाक्यांवर लांबच लांब रांगा लागल्या असून त्यामुळे बराच वेळ वाया जातो. फास्टॅगमुळे वेळ आणि पैशाची नक्कीच बचत झाली असली तरी हे तंत्रज्ञान अजूनही फारसे जलद आणि सोयीचे नाही. फास्टॅग हा भारत सरकारचा एक उपक्रम आहे ज्याच्या मदतीने राष्ट्रीय महामार्गावर न थांबता टोल भरता येतो.



पण आता फास्टॅग सुविधेतही बदल करण्यात येणार असून सॅटेलाईटच्या माध्यमातून टोल भरला जाणार असल्याच्या बातम्या येत आहेत. यासाठी जीएनएसएस सिस्टम म्हणजेच ग्लोबल नेव्हिगेशन सॅटेलाइट सिस्टीम लागू करण्यात येणार आहे. आता ही नवीन टोल वसुली यंत्रणा कशी काम करेल हे जाणून घेऊया...


**जीएनएसएस सिस्टम कसे काम करणार?**

याबाबत माहिती देताना रस्ते व वाहतूक मंत्री नितीन गडकरी म्हणाले की, भारतातील काही निवडक राष्ट्रीय महामार्गांवर जीएनएसएस (ग्लोबल नेव्हिगेशन सॅटेलाइट सिस्टीम) आधारित टोल सिस्टम केली जाईल. ही सिस्टम लागू झाल्यानंतर वाहनांना फास्टॅगची गरज भासणार नाही आणि मुख्य म्हणजे लोकांना टोल कटींगसाठी रांगेत उभे राहण्याची गरज राहणार नाही.

जीएनएसएस यंत्रणा थेट सॅटेलाइटशी जोडली जाईल आणि त्यासाठी स्वतंत्र टोल बूथ बांधले जातील. या नवीन टोल नाक्यांवर महामार्गावरून जाणाऱ्या सर्व वाहनांचा डेटा गोळा केला जाईल, जसे की कोणत्या वाहनाने किती प्रवास केला. ही सिस्टम लागू करण्यासाठी सरकारने तयारी सुरू केली आहे.

जीएनएसएस सिस्टम सुरू केल्याने फास्टॅग खरोखरच बंद होईल का? असा प्रश्न अनेकांच्या मनात आला असेल.. परंतू याबाबत कोणतीही ठोस माहिती दिलेली नाही. सध्या काही महामार्गांवर जीएनएसएस सिस्टम लागू करणार आहे, ती सर्व महामार्गांवर लागू होणार नाही. विशेष म्हणजे जीएनएसएस सिस्टम अंतर्गत ज्यांना टोल कपात करता येणार नाही. ते फास्टॅगद्वारे टोल भरू शकतील.

# पहिले यशस्वी कर्णधार विजय हजारे



**निमित्त**

विजय हजारे यांचा जन्म ११ मार्च १९१५ रोजी महाराष्ट्रातील सांगली येथे एका शिक्षकाच्या घरी झाला, परंतु लहानपणापासूनच त्यांना पुस्तकांपेक्षा क्रिकेट आणि फुटबॉलमध्ये जास्त रस होता . त्यांनी त्यांच्या क्रिकेट कारकिर्दीची सुरुवात मध्यमगती गोलंदाज म्हणून केली होती जो मनगट फिरकी गोलंदाजी देखील करू शकत होता.

हजारे यांचे पहिले मालक, देवासचे (आधुनिक मध्य प्रदेशातील) महाराजा विक्रम सिंग यांनी, बॅट आणि बॉलमध्ये हजारे यांचे प्रशिक्षण घेण्यासाठी प्रसिद्ध ऑस्ट्रेलियन फिरकी गोलंदाज क्लॅरी ग्रिमेट यांची नियुक्ती केली. ग्रिमेट यांनीच हजारे यांना त्यांच्या फलंदाजीवर लक्ष केंद्रित करण्यास सांगितले आणि त्यांना युद्धोत्तर काळातील सर्वोत्तम फलंदाजांपैकी एक बनण्यास मदत केली.

२२ जून १९४६ रोजी लॉर्ड्सवर इंग्लंडविरुद्ध पदार्पण केले आणि ३० सामन्यांच्या कारकिर्दीत त्यांनी ४७.६५ च्या सरासरीने २,१९२ धावा केल्या ज्यामध्ये सात शतके आणि नऊ अर्धशतके होती. तसेच त्यांनी २० विकेट्सही घेतल्या. तो १००० कसोटी धावा पूर्ण करणारा पहिला भारतीय फलंदाज होता आणि त्याच्या २५व्या डावात तो हा टप्पा गाठणारा सर्वात जलद फलंदाजांपैकी एक होता .

२३८ प्रथम श्रेणी सामन्यांमध्ये, हजारे यांनी ५८.३८ च्या सरासरीने १८,७४० धावा केल्या, ज्यामध्ये ६० शतके आणि ७३ अर्धशतके होती.

प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये कोणत्याही विकेटसाठी सर्वाधिक भागीदारीचा विक्रमही हजारे यांच्या नावावर होता - १९४७ च्या रणजी ट्रॉफीच्या अंतिम सामन्यात त्यांनी बडोद्यासाठी गुल महंमदसोबत होळकरविरुद्ध चौथ्या विकेटसाठी ५७७ धावांची भागीदारी केली. १९५१ मध्ये इंग्लंड संघाविरुद्ध हजारे यांनी पहिल्यांदा भारताचे नेतृत्व केले आणि दिल्ली आणि मुंबई (आता मुंबई) येथे झालेल्या पहिल्या दोन कसोटी सामन्यात शतके झळकावली. कानपूरमधील चौथी कसोटी भारताने गमावली, तर मद्रास (आता चेन्नई) येथे झालेल्या शेवटच्या कसोटी सामन्यात त्यांनी एक डाव आणि आठ धावांनी विजय मिळवत पहिला विजय नोंदवला.


द गार्डियनच्या मृत्युलेखानुसार , मर्चंटने हजारे यांच्याबद्दल म्हटले आहे: मला असे वाटते की हजारे यांनी कधीही भारताचे नेतृत्व केले नसते. ते नेहमीच एक शिस्तबद्ध सैनिक होते, कधीही सेनापती नव्हते. कर्णधारपदामुळे त्यांच्या एकाग्रतेवर परिणाम झाला आणि ते पुन्हा कधीही पूर्वीसारखे फलंदाज राहिले नाहीत. ही भारतीय क्रिकेटची एक शोकांतिका होती.

त्यांच्या शेवटच्या कसोटी सामन्यानंतर ५१ वर्षांच्या आयुष्यात ते एक खाजगी व्यक्ती होते. त्या काळात, ते भारताचा चौथा सर्वोच्च नागरी सन्मान, पद्मश्री, पुरस्काराने सन्मानित झालेले पहिले क्रिकेटपटू होते.

त्यांच्या सन्मानार्थ, राज्यांमध्ये खेळल्या जाणाऱ्या भारतातील प्रमुख देशांतर्गत एकदिवसीय स्पर्धेला विजय हजारे ट्रॉफी असे नाव देण्यात आले आहे.१८ डिसेंबर २००४ रोजी आतड्याच्या कर्करोगाने हजारे यांचे निधन झाले.

(साभार : इंटरनेट)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

### बदललेल्या जीवनशैलीमुळे तरुणांना हृदयरोग

काही वर्षांपासून हृदयविकारासंदर्भातील आजारांमध्ये लक्षणीयरीत्या वाढ झाली असून अवघ्या तिशीत तरुणांनाही हृदयविकाराचा त्रास होऊ लागला आहे. बदलती जीवनशैली, अयोग्य आहारपद्धती, वाढता ताणतणाव, मद्यपान, तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन ही प्रमुख कारणे यामागे असल्याचे तज्ज्ञांनी सांगितली. तरुणांनी हृदयविकाराला दूर ठेवण्यासाठी या बाबी टाळण्याचा सल्लाही त्यांनी दिला आहे.



अभिनेता श्रेयस तळपदे याला गुरुवारी हृदयविकाराचा झटका आला होता. त्यानंतर त्याच्यावर रुग्णालयात उपचार करण्यात आले. श्रेयसप्रमाणेच तरुणांमध्ये हृदयविकाराचे प्रमाण वाढत आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालानुसार जगभरामध्ये हृदयरोगामुळे दरवर्षी १८ दशलक्ष लोकांचा मृत्यू होतो. अन्य आजाराने होणाऱ्या मृत्यूंच्या तुलनेत हे प्रमाण ३२ टक्के आहे. भारतामध्ये हृदयरोगामुळे मृत्यू होण्याचे प्रमाण हे २७ टक्के असून, ४० ते ६९ वयोगटातील नागरिकांच्या मृत्यूचे प्रमाण ४५ टक्के आहे.

बदललेली जीवनशैली, ताणतणाव, अयोग्य आहार, मद्यपान, तंबाखूजन्य पदार्थाचे सेवन, जागरण करणे ही महत्त्वाची कारणे भारतातील हृदयविकाराने वाढत असलेल्या मृत्यूची आहेत, असे हृदयविकारतज्ज्ञ सांगतात.

पाश्चिमात्य देशांचे अनुकरण करणाऱ्या तरुणाईची जीवनशैली बदलली आहे. जागरण, धूम्रपान, मद्यपानासह दुग्धजन्य पदार्थ, केकसारखे पदार्थ खाण्याकडे कल वाढला आहे. यामुळे शरीरातील कॉलेस्ट्रेरॉल वाढून ते हृदयाच्या धमन्यांमध्ये जमा होते. त्यामुळे धमन्यांमधील पडदा कमकुवत होऊन तो फाटल्याने कॉलेस्ट्रॉल रक्ताच्या संपर्कात येऊन रक्ताच्या गाठी तयार होतात. यामुळे हृदयविकाराचा त्रास होत असल्याचे प्राध्यापक डॉ. अजय महाजन यांनी सांगितले.

आपल्या पूर्वजांपासून आपण खात आलेल्या पारंपरिक अन्नपदार्थातील घटकांनुसार आपल्या शरीरातील गुणसूत्रांची साखळी तयार होते. आपण 'फास्टफूड'मुळे त्या साखळीला हानी पोहोचवत आहोत. त्यामुळे पारंपरिक अन्नपदार्थाचा आहारात समावेश केल्यास हृदयविकाराचे प्रमाण कमी करण्यास मदत होऊ शकते. दररोज नियमित योगासने करणे, ध्यानधारणा, व्यायाम करणे आवश्यक आहे. पुरेशी झोप घेणे, फळे, सकस आहार, पालेभाज्या खाण्यावर भर द्यावा. धूम्रपान, मद्यपान, तंबाखूजन्य पदार्थाचे सेवन टाळावे.

# पार्किंगच्या असुविधेमुळे रेवदंडा बाजारपेठेत नित्याची वाहतूक कोंडी

**रेवदंडा : प्रतिनिधी**

बाजारपेठेत बेशिस्तीने केलेल्या लहान मोठ्या वाहनांच्या पार्किंगने नित्याने वाहतुक कोंडी निर्माण होते, त्यामुळे पार्किंगच्या असुविधेने रेवदंडा बाजारपेठेतील वाहतुक कोंडीची समस्या ऐरणीवर असते.

अलिबाग, मुरूड व रोहा तालुक्याला रेवदंडा हे मध्यवर्ती ठिकाण असल्याने येथून वाहनांची जा-ये मोठया प्रमाणात आहे, विशेषतः मुरूड तालुका पर्यटनक्षेत्र म्हणून प्रसिध्दीस असल्याने येथून पर्यटक मोठ्या प्रमाणात येत असतात, त्यांना रेवदंडा मार्गेच मुरूडकडे जा-ये करावी लागते. रेवदंडा बाजारपेठ सुमारे दोन किमी अंतरामध्ये बसलेली आहे, या बाजारपेठेतील रस्ता अंत्यत अंरूद आहे.त्यामुळे वाढत्या वाहतुकीचा ताण रेवदंडा बाजारपेठेतील अरूंद रस्ताला नेहमीच असतो.



**पार्किंग सुविधा नसल्याने वाहनांचा अडथळा**

रेवदंडा बाजारपेठेतील अगोदरच अरूंद असलेल्या रस्ता वाहनांची जा-ये करताना नित्याने वाहने व प्रवासीवर्गाला वाहतूक कोडींच्या समस्येला सामोरे जावे लागते.विशेष म्हणजे रेवदंडा बाजारपेठेतील अरुंद रस्त्याला कुठेही पार्किंग सुविधा नसल्याने जा-ये करणारा वाहनांना बाजारपेठेत बेशिस्तीने पार्किंग केलेल्या वाहनाचा अडथळा होतो व वाहतूक कोंडी निर्माण होते.

**बाजारात वाहनांची बेशिस्त पार्किंग**

रेवदंडा बाजारपेठेत अलिबाग, मुरूड व रोहा तालुक्यातील गावे व रेवदंडा पंचक्रोशीतील गावे अवंलबून आहेत, त्यामुळे रेवदंडा बाजारपेठ नित्य गर्दीचे ठिकाण आहे. येथे बाजारपेठेत खरेदीसाठी नित्याची गर्दी असते, बाजारपेठेतील अरूंद रस्तात मोटर सायकल, रिक्षा, मालवाहतूक टेम्पो, तसेच लहान मोठी वाहने बेशिस्तीने पार्किंग केली जातात. त्यामुळे बाजारपेठेतील अरुंद रस्त्याने जा-ये करणाऱ्या मोठ्या बसेस, मालवाहतूक ट्रक यांना अडथळा निर्माण होतो, त्यामुळे वाहतूक कोंडी नित्याने होते. मुख्यः रस्ता अरूंद असल्याने पार्किंग समस्या सुध्दा निश्चिपतच जाणवते. बाजारपेठेतील अरुंद रस्तात पार्किंग सुविधा उपलब्ध होत नसल्याने बाजारपेठेत गर्दीच्या वेळी रस्त्यात वाहतुकीची कोंडी निर्माण होते.

**पार्किंग सुविधा अत्यंत गरजेची**

बाजारपेठेतील अरुंद रस्ताने दोन मोठी वाहने पास होताना फारच जिकीरीचे असते. शिवाय रस्त्यात उभी केलेली लहान मोठी वाहने वाहनांच्या जा-ये करताना अडथळा निर्माण करतात. रेवदंडा गोळा स्टॉप ते रेवदंडा हायस्कुल दरम्यान नित्याने वाहतूक कोंडीची समस्या असते. विशेषतः केळकर स्टॉप, अर्बन बँक, पारनाका, ते पुढे रेवदंडा हायस्कूलपर्यंत नित्याची वाहतूक कोंडी निर्माण होत असते. रेवदंडा बाजारपेठेतील गोळा स्टॉप ते रेवदंडा हायस्कूल या एक किमी अरुंद रस्त्याच्या अंतरामध्ये कुठेही पार्किंग सुविधा नसल्याने ही वाहतूक समस्या निर्माण होते. रेवदंडा बाजारपेठेतील अरूंद असलेल्या रस्त्याला पार्किंग सुविधा नसल्यानेच वाहतूक कोंडी होत असल्याचे निदर्शनास येते.

# बोरघाटात अमृतांजन पुलाला ट्रक धडकला; चालक ठार



**खालापूर : प्रतिनिधी**

पुण्याहून मुंबईकडे जाणाऱ्या भरधाव मालवाहू ट्रकचा भीषण अपघात झाल्याची घटना घडली आहे. ट्रकचालकाचे नियंत्रण सुटल्याने खंडाळा बोरघाटातील अमृतांजन ब्रिजला ट्रकची जोरदार धडक बसली. या भीषण अपघातात ट्रक चालकाचा जागीच मृत्यू झाला आहे. मुंबई-पुणे यशवंतराव चव्हाण एक्सप्रेस वेवर बुधवारी (दि. १७) हा भीषण अपघात झाला.

अपघातग्रस्त ट्रक पुण्याहून मुंबईकडे सिमेंटचे बॉक्स घेऊन निघाला होता. या अपघातानंतर मुंबईकडे जाणाऱ्या लेनवर काही काळ वाहतूक विस्कळीत झाली होती. घटनेची माहिती मिळताच खंडाळा बोरघाट पोलीस घटनास्थळी दाखल होत परिस्थिती नियंत्रणात आणली आहे, मात्र या भीषण अपघातात चालकाचा जागीच मृत्यू झाला आहे.

या अपघातानंतर ट्रकमधील सिमेंटचे बॉक्स रस्त्यावर पडल्याचं पाहायला मिळाले. दरम्यान, ट्रक चालकाचे नियंत्रण सुटल्याने खंडाळा बोरघाटातील अमृतांजन ब्रिजला ट्रकची जोरदार धडक बसल्याची माहिती मिळाली आहे.

सदरचा मालवाहू ट्रक ही भरधाव वेगाने होती अशी माहिती मिळाली आहे. या अपघातानंतर काही वेळ वाहतूकदेखील विस्कळीत झाल्याचे पाहायला मिळाले, मात्र घटनेनंतर पोलीस लगेच घटनास्थळी दाखल झाले होते. त्यांनी वाहतूक सुरळीत करण्याचे प्रयत्न सुरु केले होते. अपघातप्रकरणी पोलीस अधिक तपास करीत आहेत.


## सार्वजनिक सूचना

ही सूचना सर्व संबंधितांना कळविण्यात येते की **सिडको/बी.यु.डी.पी./वप्रसअ/३५/०१०१८२७** असा अनुक्रमांक असलेले मूळ अलॉटमेंट लेटर, जे **०३/०१/१९९६** रोजी जारी करण्यात आलेले, आणि **रूम क्र. १२, प्रतिक सी.एच.एस., प्लॉट क्र. बी/४८, सेक्टर १२, खारघर ४१०२१०** या मालमत्तेसंदर्भात हौशा बापू महादेव सरगर यांच्या नावावर जारी करण्यात आले होते, ते हरवले असून सर्वतोपरी शोध घेऊनही आजतागायत सापडलेले नाही.

याद्वारे स्पष्ट करण्यात येते की वरील नमूद मालमत्तेचा सध्याचा **मालक श्री. उमाकांत भगवान पाटील** असून त्यांनी सदर मालमत्तेवरील सर्व हक्क, अधिकार व मालकी कायदेशीररित्या प्राप्त केलेली आहे. सदर हरवलेले अलॉटमेंट लेटर कोणत्याही व्यक्ती, बँक, वित्तीय संस्था किंवा अन्य कोणत्याही प्राधिकरणाकडे तारण, गहाण किंवा जमा केलेले नाही. वरील हरवलेल्या अलॉटमेंट लेटर किंवा संबंधित मालमत्तेबाबत कोणालाही कोणताही हक्क, मालकीहक्क, स्वारस्य, दावा अथवा हरकत नाही.

जर कोणास सदर हरवलेले दस्तऐवज सापडले असतील किंवा त्याबाबत कोणताही दावा, हक्क किंवा हरकत असल्यास, त्यांनी या सूचनेच्या प्रकाशनाच्या तारखेपासून **१५ (पंधरा) दिवसांच्या** आत खाली नमूद केलेल्या पत्त्यावर संपर्क साधावा. दिलेल्या कालावधीत कोणताही दावा किंवा हरकत प्राप्त न झाल्यास, कोणताही दावा अस्तित्वात नाही असे गृहीत धरले जाईल आणि माझ्या ग्राहकास डुप्लिकेट अलॉटमेंट लेटर मिळविण्यासाठी तसेच आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्यासाठी पूर्ण स्वातंत्र्य राहील.

दि.१८/१२/२०२५.

**सही/-**
**वकील आदित्य कटकदौड**
**खारघरचा राजा गणेश मंदिर (तळमजला)**
**सेक्टर १२ खारघर नवी मुंबई ४००२१०**

## सार्वजनिक सूचना

ही सूचना सर्व संबंधितांना कळविण्यात येते की **सिडको/बी.यु.डी.पी./वप्रसअ/५९०/५७२४७ असा अनुक्रमांक असलेले मूळ अलॉटमेंट लेटर, जे ०३/०१/१९९६** रोजी जारी करण्यात आलेले, आणि रूम **क्र. - ११, प्रतिक सी.एच.एस., प्लॉट क्र. बी/४८, सेक्टर १२, खारघर ४१०२१०** या मालमत्तेसंदर्भात **चंद्रकांत काशिनाथ जाधव** यांच्या नावावर जारी करण्यात आले होते, ते हरवले असून सर्वतोपरी शोध घेऊनही सापडलेले नाही. -


याद्वारे स्पष्ट करण्यात येते की वरील नमूद मालमत्तेचे सध्याचे मालक **श्रीमती योगिता भगवान पाटील व श्री ऋषिकेश भगवान पाटील** असून त्यांनी सदर मालमत्तेवरील सर्व हक्क, अधिकार व मालकी कायदेशीररीत्या प्राप्त केलेली आहे. सदर हरवलेले अलॉटमेंट लेटर कोणत्याही व्यक्ती, बँक, वित्तीय संस्था किंवा अन्य कोणत्याही प्राधिकरणाकडे तारण, गहाण किंवा जमा केलेले नाही. वरील हरवलेल्या अलॉटमेंट लेटर किंवा संबंधित मालमत्तेबाबत कोणालाही कोणताही हक्क, मालकीहक्क, स्वारस्य, दावा अथवा हरकत नाही.

जर कोणास सदर हरवलेले दस्तऐवज सापडले असतील किंवा त्याबाबत कोणताही दावा, हक्क अथवा हरकत असल्यास, त्यांनी या सूचनेच्या प्रकाशनाच्या तारखेपासून **१५ (पंधरा) दिवसांच्या** आत खाली नमूद केलेल्या पत्त्यावर संपर्क साधावा. दिलेल्या कालावधीत कोणताही दावा किंवा हरकत प्राप्त न झाल्यास, कोणताही दावा अस्तित्वात नाही असे गृहीत धरले जाईल आणि माझ्या ग्राहकांना डुप्लिकेट अलॉटमेंट लेटर मिळविण्यास तसेच आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्यासाठी पूर्ण स्वातंत्र्य राहील.

दि.१८/१२/२०२५.

**सही/-**
**वकील आदित्य कटकदौड**
**खारघरचा राजा गणेश मंदिर (तळमजला)**
**सेक्टर १२ खारघर नवी मुंबई ४००२१०**


# दिव्यांग-वृद्धांचा त्रास वाचविण्यासाठी पोलादपूरचे सेतू केंद्र आता जमिनीवर



**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील दिव्यांग आणि वृध्दांसह महिलांनादेखील तहसिल कार्यालयाच्या वरच्या मजल्यावर असलेल्या सेतू केंद्रात जाण्यासाठी धक्का नसलेल्या जिना चढून जा-ये करण्याचा त्रास कमी करण्यासाठी तहसिलदार कपिल घोरपडे यांनी सेतू केंद्र आता जमिनीवर आणले आहे. सोमवारपासून या सेतू केंद्रामध्ये कामकाजाला सुरूवात करण्यात आल्याची माहिती संचालक श्रीकांत मालुसरे यांनी दिली.

पोलादपूर तहसिल कार्यालयामधील सेतू केंद्रामध्ये जातीचा दाखला, उत्पन्नाचा दाखला, रहिवासी दाखला, अल्पभूधारक दाखला, नॉन-क्रिमिलेअर, शेतकरी प्रमाणपत्र, संजय गांधी निराधार योजना दाखला इत्यादींसाठी अर्ज करण्यासाठी तसेच विविध शासकीय परवाने मिळवण्यासाठी ऑनलाइन अर्ज भरणे, टोकन सिस्टीम, रिअल-टाइम स्टेटस तपासणे आणि अर्जदाराचा वेळ वाचवण्यासह सरकारी कार्यालयांमध्ये होणारी गर्दी आणि गैरसोय टाळणे तसेच आवश्यक सेवा घराच्या जवळ उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र शासनातर्फे सुरू करण्यात आलेल्या पोलादपूर तालुक्यातील ग्रामीण भागातील आबालवृध्द महिला पुरूष ग्रामस्थ येत असतात.

मात्र, गेल्या चार पाच वर्षांपासून पोलादपूर तालुक्यातील सेतू सेवा केंद्र तहसिल कार्यालयाच्या वरील मजल्यावर असल्याने शारिरीक त्रास असलेल्या नागरिकांना अवघड तसेच सुलभ नसल्याने गैरसोय वाटत असल्याचे दिसून आले. यामुळे पोलादपूरचे तहसिलदार कपिल घोरपडे यांनी जुन्या ब्रिटीशकालीन तहसिल कार्यालयाच्या बेसमेंटवर पत्राशेडमध्ये सेतू केंद्र सुरू करण्यासाठी आकर्षक पत्राशेड उभारून सेतू सेवा केंद्राचे संचालक श्रीकांत मालुसरे यांना कामकाज जमिनीवर सुरू केल्यास नागरिकांची गैरसोय टाळणे शक्य होणार असल्याचे सुचविले. त्यानुसार सोमवार दि. १५ डिसेंबर २०२५ पासून महाराष्ट्र शासनाचे सेतू सेवा केंद्र नव्या पत्राशेडमध्ये सुरू करण्यात आले आहे. अशी माहिती संचालक श्रीकांत मालुसरे यांनी दिली.

# महागावच्या वरदायिनी विद्यालयास सीसीटीव्ही कॅमेरे भेट

**तळा :** तळा तालुक्यातील वरदायिनी विद्यालय महागाव माध्यमिक शाळेस इयत्ता १० वी सन १९९५/९६ च्या बॅचने अंदाजे २५०००/ किंमतीचे सीसीटीव्ही कॅमेरे शाळेस विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने देणगी स्वरूपात भेट देण्यात आली.



ही भेट माजी विद्यार्थी सुनिल बयकर,धर्मा राणे,गणेश मानकर, मंगेश महाडिक, नितीन तांबट, तुकाराम कदम, सचिन घाडगे,कुंदन पवार, संतोष कजबले, अरूण मोरे, संदेश कडव, इत्यादींनी सदर भेट शाळेच्या मुख्याध्यापकांकडे दिली. याचवेळी शाळेच्या वतीने माजी विद्यार्थ्यांचे पत्र देऊन आभार व्यक्त केले आहेत.

सीसीटीव्ही कॅमेरे दिल्याने शाळेचा परिसर कॅमेऱ्यामधे आला असून शाळेच्या विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेला यामुळे आधार मिळाला आहे.


GOVERNMENT OF MAHARASHTRA, HOME DEPARTMENT (PORTS & TRANSPORT)
**MAHARASHTRA MARITIME BOARD**
Indian Mercantile Chambers, 2nd Floor, Ramjibhai Kamani Marg, Ballard Estate, Mumbai - 400 001. Tel.: 022-69041777 Fax : 022-69041740
Website : https://mahammb.maharashtra.gov.in
Email: ceo.mmb@maharashtra.gov.in / ceommb@gmail.com

**Second E-Tender Notice - (Year 2025-26)**
**Main Portal:** https://mahatenders.gov.in

Digitally signed E-Tender for following work is invited by Chief Executive Officer, Maharashtra Maritime Board, Mumbai, from Registered with Government of Maharashtra in appropriate class and having experience in Project Management Consultant, for following work in B1 Tender Form.

| Sr. No. | Name of Work | Earnest Money Amount in Rs. | Blank Tender form amount in Rs. |
|---|---|---|---|
| 1 | Appointment of Project Management Consultancy Services for Providing Infrastructural Post Harvesting Facilities to Fisherman at Fish Landing Center Revdanda Tal. Alibag Dist. Raigad. | 1,50,000/- | 1,180/- |

The details can be viewed online and downloaded directly from the Government of Maharashtra E-Tendering Portal https://mahatenders.gov.in on **18.12.2025 at 17:00 to 26.12.2025 at 17:00 hours (IST)**

The right to reject any or all tenders without assigning any reason is reserved.

Sd/-
Executive Engineer,
Maharashtra Maritime Board,
Mumbai.



## जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील वर्णनाची मिळकत ही आमचे अशिल व सदर मिळकतीचे मालक व भोगवटादार श्री. कमळाकर गणा मुंबईकर, रा. तक्का, तालुका पनवेल, जिल्हा रायगड यांचे मालकी हक्काची असून त्यांचे नावे सात बारा उताऱ्यावर दाखल आहे. सदर मिळकतीचे वर्णन येणेप्रमाणेः

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे-भोकडपाडा, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड.**

| अ.क्र | भूमापन क्रमांक | उपविभाग | क्षेत्र चौ.मी | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| १. | १ | १/२३ | ३३७.५० चौ.मी | ३३.७५ |

वर नमुद ३३७.५० चौ मी इतक्या मोजमापाच्या बिन शेती जमीन मिळकतीचे क्षेत्रास यापुढे 'सदर मिळकत' असे संबोधिले आहे.

आमचे अशिल हे इच्छुक खरेदीदाराकडून उक्ती किंमत घेवून वर नमुद केलेली 'सदर मिळकत ही रजिस्टर्ड कायम खरेदीखता ने विकत देण्याचा व्यवहार करीत आहेत.

तरी सर्व संबंधितांना या 'जाहीर नोटीसी ने सुचित करण्यात येत आहे की, वर नमूद केलेल्या सदर मिळकती बाबत कोणाचाही कोणत्याही स्वरुपाचा हक्क - हितसंबंध व अधिकार असल्यास आणि अगर कोणाही व्यक्ती, इसम, संस्थेने आमचे अशिल श्री कमळाकर गणा मुंबईकर, रा. तक्का, तालुका पनवेल, जिल्हा रायगड यांचेशी कोणत्याही स्वरुपाचा करार, दस्त जसे खरेदीखत, साठेकरार, विकसन करार, एम ओ यू.. हक्कसोडपत्र, भाडेपट्टा, वचनचिठ्ठी, बयाणा पावती, गहाण, दान, बक्षीसपत्र, अखत्यारपत्र इच्छापत्र वगैरे आणि अगर अन्य प्रकारे कोणताही कायदेशीर मालकी हक्क - हितसवध, ताबेकबजा, वहीवाट वापर वगैरे अधिकार व हक्क निर्माण केला असल्यास अशा व्यक्ती, इसम, संस्थेने सदर 'जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून चौदा दिवसांच्या मुदतीत आपला कायदेशीर हक्क व अधिकार कागदोपत्री पुराव्यानिशी रजिस्टर्ड पोस्ट ए.डी.ने आमचेकडे सिध्द करावा.

अन्यथा अशी हरकत वर नमुद केलेल्या मुदतीत आम्हास न मिळाल्यास 'सदर मिळकती 'च्या खरेदी-विक्री व्यवहारास कोणाचीही कोणत्याही स्वरुपाची हरकत नसल्याचे गृहीत धरुन आमचे अशिल 'सदर मिळकती 'चा खरेदी-विक्री व्यवहार पूर्ण करतील मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे अशिलावर बंधनकारक रहाणार नाहीत, याची सर्वांनी नोंद घ्यावी म्हणून ही नोटीस प्रसिध्द केली आहे.

**स्थळ :- पनवेल.**
**दि. १७/१२/२०२५**

**सही/-**
**ॲड. सलिल अब्दुलरहमान शेख**
**( ॲडव्होकेट हायकोर्ट)**
**कार्यालय :** १, स्वप्नपूर्ती १३४६ बी/१. शाह प्लाझाजवळ, प्रभु आळी, पनवेल, जि. रायगड- ४१०२०६


# वडगाव येथे मुलींनी साकारली वारली चित्रकलेची भिंत



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी पाताळगंगा परिसरातील रायगड जिल्हा परिषद उच्च प्राथमिक ग्रामीण उत्कृष्ट शाळा वडगाव येथे वर्गशिक्षक सुभाष राठोड यांनी मुलांना 'माझा कोपरा,माझी कला' हा उपक्रम दिला होता.त्यातून कस्तुरी व आकांक्षा दोघींच्या विचारांनी ही वारली आदिवासी कलेची भिंत साकारण्याचे ठरवले.

शाळेच्या कार्यालयासमोर अशीच खराब असलेली भिंत साफ करून मातीने सारवून ती स्वच्छ करण्यात आली व हळूहळू आपल्या कुंचल्यातून वारली चित्रकला चितारत या दोन्ही चिमुकल्या मुलींनी आकर्षक आशी वारली व आदिवासी जीवनशैली साकारली यात जल,जंगल,जमीन असे नाव दिले.घर,पाळीव प्राणी,पक्षी,झाडे असे विविध चित्रांतून वेगवेगळे आशय या मुलिनी मांडला आहे.

त्याच बरोबर कु.हर्ष एकनाथ गडगे इयत्ता सहावी यानेसुद्धा भारतीय २२ भाषा लेखन करून शालेय सजावटीत उत्कृष्ट योगदान दिले आहे.वडगाव शाळेचे मुख्याध्यापक सुभाष राठोड सर हे नेहमीच नाविन्यपूर्ण उपक्रम राबवत असतात.

# सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांसाठी मोफत मोतीबिंदू तपासणी

**अलिबाग :** रायगड विभागातील राज्य परिवहन निवृत्त कर्मचारी संघटनेचा वार्षिक स्नेहमेळावा २८ डिसेंबर रोजी बापुजी देव मंदिर, सावरसई पेण येथे आयोजित करण्यात आला आहे. स्नेह मेळाव्या निमित्ताने येणार्या सेवानिवृत्त सभासदांसाठी साठी रोटरी क्लब ऑफ पेण च्या माध्यमातुन नेत्र (मोतीबिंदू) तपासणी व सरकारी योजनेतून मोफत शस्त्रक्रिया शिबिर आयोजित करण्यात आले आहे. स्नेह मेळाव्यासाठी संघटनेचे सरचिटणीस सदानंद विचारे प्रसिद्धी सचिव रत्नपाल जाधव, केंद्रीय उपाध्यक्ष रमेश यादव व ठाणे विभागाचे सचिव अभिमन्यु शिरसाट उपस्थित रहाणार आहेत.


## पनवेल महानगरपालिका
## ता. पनवेल, जि. रायगड, पिन ४१० २०६

ई-मेल : panvelcorporation@gmail.com दुरध्वनी कार्यालय : ०२२-२७४५८०४०/४१/४२
pmc.townplanning@gmail.com वेबसाईट - panvelcorporation.com

**जाहीर नोटीस सूचना**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन उक्त अधिनियम कलम ८(३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहीर करण्यात येते की

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | बांधित झाडांची संख्या | झाडे तोडण्याचे कारण व ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | एल. के. दिवानी इन्फ्रा एल. एल. पी., १११२, फ्लॅटनं. ११, द लॅन्डमार्क बिल्डिंग, प्लॉट नं. २६ए, सेक्टर ०७, खारघर, ता. पनवेल, जि. रायगड | ०४ गुलमोहर झाडे तोडणे. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्लॉट नं. ४ बी, सेक्टर २१, नवीन पनवेल (पूर्व), ता. पनवेल जि. रायगड येथील ०४ गुलमोहर झाडे हे नवीन इमारतीचे बांधकाम बाधित होत आहेत. |
| २ | M/s. J. M. M. Homes., Off. Market Yard, Plot No.- 56/57/58, Sahakar Nagar, Panvel. | ०१ आंबा झाड तोडणे. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील सत्यम शिवम सुंदरम को. ऑप. हौ. सोसा. लि., फायनल प्लॉट नं.- ९७/१,९७/३ आणि ९७/४, पनवेल, ता. पनवेल जि. रायगड येथील ०१ आंबा झाड हे नवीन इमारतीचे बांधकाम बाधित होत आहे. |
| ३ | M/s. J. M. M. Homes., Off. Market Yard, Plot No.- 56/57/58, Sahakar Nagar, Panvel. | ०१ जंगली व ०१ पिंपळ अशी एकूण ०२ झाडे तोडणे. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील गीतांजली को. ऑप. हौ. सोसा. लि., फायनल प्लॉट नं. २६४, पनवेल, ता. पनवेल जि. रायगड येथील ०१ जंगली व ०१ पिंपळ अशी एकूण ०२ झाडे हे इमारतीचे पुनर्विकासाच्या कामामध्ये बाधित होत आहेत |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही हरकती अगर सूचना असल्यास ही सूचना प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात योग्य त्या कागदपत्रांसह पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण व उद्यान विभागामध्ये सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास सदरची झाडे तोडणेस वरील अर्धानियमानुसार सशर्त परवानगी देणेबाबत पुढील कार्यवाही करण्यास येईल, याची नोंद घ्यावी.

**जा.क्र.:-पमपा/जनसंपर्क./३१२५/प्र.क्र. ७१६/७४०/२०२५**
**दिनांक :- १७/१२/२०२५**

**सही/-**
**उपायुक्त**
**(वृक्ष प्राधिकरण विभाग)**
**पनवेल महानगरपालिका**



## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमिन मिळकत ही त्यापुढे नमूद केलेल्या जमिन मालकाकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मौजे-बोर्ले, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड.**

| भूमापन नं./ हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. | जमीन मालकांची नावे |
|---|---|---|---|
| ८६/३/ब | ०-२२-३० | १.७५ | भगवान काशिनाथ पाटील |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच करावी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**पनवेल.**
**दि. १७/१२/२०२५**

**सही/-**
**ॲड. प्रशांत अशोक भुजबळ**
**कार्यालय :** २, आशादिप अपार्टमेंट, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ, अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल. ता. पनवेल जि. रायगड, मो.क्र. : ९९३०३६९८६१

# पोलिसांकडून शालेय विद्यार्थ्यांचे प्रबोधन

## रिटघर विद्यालयात सायबर गुन्हे व वाहतूक नियमांबाबत मार्गदर्शन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री भैरवदेव विद्यालय व लोकनेते रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालय पनवेल येथे मंगळवारी (दि.१६) सायबर गुन्हे आणि वाहतूक नियमाबाबत प्रबोधन करण्यात आले. पांडुरंग पवार साहेब (पो.उपनिरीक्षक) नवीन पनवेल वाहतूक शाखा यांनी ११ वी १२वी च्या सर्व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या मार्गदर्शन शिबीरामध्ये एकूण १५० विद्यार्थी उपस्थित होते.

पवार सरांनी विद्यार्थ्यांना मोबाईल वरील लिंक आपल्याला कशाप्रकारे हानिकारक असतात या विषयी माहिती दिली. तसेच मुलांनी, मुलींनी कणखर झाले पाहिजे यासाठी विविध उदाहरणे दिली.तसेच अनेक उदाहरणे देऊन विद्यार्थ्यांना प्रेरित करण्याचा प्रयत्न केला. वाईट गोष्टी पासून लांब राहा, चांगले गुण आत्मसात करा असे सांगितले.

या कार्यक्रमासाठी मा.वि. केवाळे विद्यालयाचे आर. एस.पी.शिक्षक अनंत गायकर सर,विद्यालयाचे मुख्याध्यापक कारंडे आर.बी. सर इयत्ता १० वी व १२ वी चे विद्यार्थी,सर्व शिक्षक वृंद उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन, प्रास्ताविक व स्वागत अमित पाटील सर यांनी केले. या कार्यक्रमाचे आभार अशोक पाटील सर यांनी मानले व कार्यक्रम झाला.

# आचारसंहिता नियमांचे काटेकोर पालन करा -डॉ. कैलास शिंदे



**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ करिता आदर्श आचारसंहिता लागू झाली असून आचारसंहिता कालावधीत सर्व नियमांचे काटेकोर पालन व्हावे यादृष्टीने आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी विभागप्रमुख व विभाग अधिकारी यांच्या निवडणूकविषयक आढावा बैठकीप्रसंगी दिले.

या वेळी अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार व डॉ. राहुल गेठे, शहर अभियंता शिरीष आरदवाड, निवडणूक विभागाचे उपआयुक्त भागवत डोईफोडे आणि इतर विभागप्रमुख आणि अधिकारी उपस्थित होते. १५ डिसेंबर रोजी सायंकाळपासून नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात लागू झालेल्या आदर्श आचारसंहितेच्या अनुषंगाने अनाधिकृत बॅनर्स विरोधात धडक मोहीम हती घेण्यात आली असून महानगरपालिकेच्या मालमत्तांवरील उद्घाटन - भूमिपूजनाच्या कोनशिला तसेच राजकीय व्यक्तींची नावे असलेले फलक झाकून घेण्यात येत आहेत. सदर कार्यवाही ४८ तासात काटेकोरपणे पूर्ण करावी व तशाप्रकारचा अहवाल सादर करावा असे स्पष्ट निर्देश आयुक्तांनी यावेळी दिले.

निवडणूक ३० दिवसांनी असल्याने या कालावधीत निवडणूकीच्या कामाला संपूर्ण प्राधान्य द्यावे असे निर्देशित करतांनाच मतदान केंद्रांच्या जागांची पुनर्पाहणी करावी असे सूचित करण्यात आले. मतदान केंद्रांवर पुरविण्याच्या सुविधांकडेही बारकाईने लक्ष द्यावे व सर्व मतदान केंद्रांचे जिओ टॅगींग करुन घ्यावे म्हणजे त्याचा उपयोग नागरिकांसह सर्वांनाच होईल अशाही सूचना आयुक्तांनी या वेळी दिल्या.

डिस्ट्रिक इलेक्शन प्लॅन सारखा वॉर्ड इलेक्शन प्लॅन तयार करावा जेणेकरुन त्यातील टेम्प्लेटनुसार प्रत्येक बाबनिहाय कार्यवाही करणे व ती पूर्ण झाल्याची खात्री करणे सोयीचे ठरेल असे सूचित करतांनाच आयुक्तांनी दुबार मतदार यादीची पाहणी करण्याचे काम जलद व अचूक पूर्ण करावे असे निर्देश दिले.

निवडणूकीच्या अनुषंगाने आचारसंहितेचे पालन, मतदान केंद्रावरील सुविधा तसेच मतदार यादी या बाबींवर विशेष लक्ष देण्याचे निर्देशित करतांनाच आयुक्तांनी प्रत्येक विभाग अधिकारी यांनी आपापल्या कार्यक्षेत्रातील पोलीस अधिकारी यांच्याशी समन्वय राखावा आणि निवडणूक प्रक्रिया सुलभ होण्याकडे लक्ष द्यावे, असे निर्देश दिले.

# एफ.जी. नाईक महाविद्यालयाचा सांस्कृतिक सप्ताह जल्लोषात साजरा



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

कोपरखैरणे येथील श्रमिक शिक्षण मंडळाचे एफ. जी. नाईक महाविद्यालयाचा सांस्कृतिक सप्ताह मोठ्या दिमाखात व जल्लोषात साजरा करण्यात आला.

या सप्ताहात वकृत्व स्पर्धा, रील मेकिंग, कार्ड मेकिंग, रांगोळी व मेहंदी स्पर्धा, पोस्टर मेकिंग, ब्रायडल मेकअप, नेल आर्ट, ऍड मॅड शो तसेच विद्यार्थ्यांनी बनवलेल्या खाद्यपदार्थांचे स्टॉल, मीस मॅच डे, ट्रॅडिशनल डे, फॅन्सी ड्रेस डे, रोझ डे, सारी डे, टाय डे आदी कार्यक्रम झाले.

प्रारंभी, सदर सांस्कृतिक सप्ताहचे उद्घाटन मनपा शाळा क्रमांक ९४च्या मुख्याध्यापिका अमिता पंडित भट, आर्किटेक अश्विनी देशपांडे, महाविद्यालयाचे प्राचार्य प्रताप महाडिक यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी एफ जी नाईक महाविद्यालयाचे समन्वयक डॉ. दत्तात्रय घोडके, सांस्कृतिक समिती प्रमुख प्रा. जयश्री दहाट समिती सदस्य प्रा.समिधा पाटील, प्रा. सीमा शिंदे, प्रा. चिन्मयी वैद्य सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी व परीक्षक नवी मुंबई महानगरपालिका शाळा क्रमांक ९४ मुख्याध्यापिका अमिता पंडित भट यांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे कौतुक करत त्यांच्या कलाकृती सादरीकरणातील विविधता नाविन्यता, कल्पकता, आत्मविश्वास त्याचबरोबर व्यासपीठावरील त्यांचा वापर याविषयी सखोल माहिती देत अतिशय सूक्ष्म परीक्षण करत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले तसेच विद्यार्थ्यांनी त्यामध्ये कोणते बदल करणे आवश्यक आहे याची संपूर्ण माहिती विद्यार्थ्यांना देत, पुढील यशस्वी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

या सांस्कृतिक आठवड्या दरम्यान आयोजित विविध स्पर्धांचे परीक्षण अमिता पंडित भट, अश्विनी देशपांडे या परीक्षकांनी केले. अलिशा मेर तृतीय वर्ष कला शाखा हिने यावर्षीचा रोझ क्वीन हा किताब पटकावला तर अर्जुन फाळके तृतीय वर्ष कला शाखा याने रोझ किंग हा किताब पटकावला.

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी विविध कला कौशल्य सादर करत कार्यक्रम मोठ्या जल्लोषात साजरा केला. या सांस्कृतिक आठवड्यातील विविध कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महाविद्यालयातील प्रा. योगिता पाटील, प्रा. सीमा शिंदे, प्रा. जयश्री दहाट तसेच विद्यार्थी मानसी कापडणीस, साक्षी गायकवाड, वैभवी घोलेकर यांनी केले तर उपस्थित सर्व मान्यवरांचे आभार सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. जयश्री दहाट यांनी मानले.

# युईएस कॉलेजमध्ये वार्षिक क्रीडा महोत्सव



**उरण : वार्ताहर, बातमीदार**

दरवर्षीप्रमाणे यंदाही शनिवारी (दि१३) युईएस स्कूल, ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स ॲण्ड कॉमर्स ॲण्ड कॉलेज ऑफ मॅनेजमेंट ण्ड टेक्नॉलॉजी मध्ये वार्षिक क्रीडा महोत्सव मोठया जोशपूर्ण वातावरणात साजरा झाला.

क्रीडा महोत्सवाला प्रमुख पाहुणे म्हणून उरण पोलीस स्टेशनचे पोलिस इनस्पेक्टर संजय जोशी लाभले होते. युईएस संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत ठक्कर यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन प्रमुख पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला. त्यानंतर संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत ठक्कर, उपाध्यक्ष श्री. मिलिंद पाडगांवकर, सहसचिव ॲड. अपूर्वा ठाकूर, सदस्य व माजी अध्यक्ष आर्किटेक्ट तनसुख जैन यांचा स्कूल आणि ज्यु. कॉलेजच्या प्राचार्या, माध्यमिक व प्राथमिक विभागाच्या पर्यवेक्षिका तसेच सिनिअर कॉलेजच्या विभाग प्रमुख यांचा हस्ते गुलाब पुष्प देऊन सन्मान करण्यात आला. त्यांच्यासोबत व्यासपीठावर समन्वयक, पूर्व प्राथमिक विभागातील पर्यवेक्षिका तसेच पीटीए मेंबर्स उपस्थित होते.

दरवर्षीप्रमाणे ह्यावर्षीही ज्युनिअर व सिनिअर कॉलेजच्या विदयार्थ्यांमध्ये शो मॅच कबड्डी सामना झाला, ज्यात ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी विजय मिळविला. क्रीडा महोत्सवाच्या पारितोषिक वितरण समारंभात विजयी विदयार्थ्यांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पदक व प्रशस्तिपत्रक देऊन गौरविण्यात आले. विजयी ठरलेल्या शिवनेरी हाऊसला प्रमुख पाहुणे तसेच यु. ई. एस. संस्थेचे अध्यक्ष ह्यांच्या हस्ते ढाल देऊन तसेच महिलांच्या व पुरुषांच्या क्रिकेट स्पर्धेतील विजयी संघालाही सन्मान चिन्ह देऊन गौरविण्यात आले.

# ओएनजीसी येथे सेफ्टी अवेअरनेस वीक



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल शहर पोलीस ठाणे हद्दीतील ओएनजीसी कंपनीत १३ डिसेंबर ते १९ डिसेंबरदरम्यान सेफ्टी अवेअरनेस वीक आयोजित करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने १५ डिसेंबर रोजी सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन पोवार यांनी उपस्थित ओएनजीसी कंपनीतील अधिकारी, कर्मचारी यांना कंपनी परिसरात तसेच कंपनीत काम करताना घ्यावयाच्या सुरक्षिततेबाबत व सायबर सुरक्षितता याबाबत मार्गदर्शन केले.

नवी मुंबई पोलीस व्हॉट्सॲप चॅनलची माहिती देण्यात आली. या वेळी कंपनीचे मुख्य अधिकारी उदय पासवान तसेच ६० ते ७० अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

# कामोठे येथे महिलांसाठी मोफत फॅब्रिक पेंटिंग कार्यशाळा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दिशा महिला मंचच्या वतीने कामोठे येथील आई माताजी मंदिर सेक्टर ३६ या ठिकाणी महिलांसाठी मोफत फॅब्रिक पेंटिंग कार्यशाळेचे यशस्वी आयोजन करण्यात आले. परिसरातील ३२ महिलांनी या कार्यशाळेत सक्रिय सहभाग नोंदवला.

या कार्यशाळेसाठी प्रसिद्ध प्रशिक्षिका भावना सरदेसाई यांनी महिलांना फॅब्रिक पेंटिंगचे प्राथमिक ते प्रगत तंत्र अत्यंत सोप्या आणि प्रभावी पद्धतीने शिकवले. रंगांची निवड, डिझाईनची मांडणी, ब्रशचा वापर, तसेच फॅब्रिकवर टिकाऊ पेंटिंग कसे करावे याबाबत सविस्तर व उपयुक्त मार्गदर्शन त्यांनी केले. महिलांनी प्रत्यक्ष कृतीतून कला शिकण्याचा आनंद घेतला. या कार्यक्रमास दिशा महिला मंचच्या संस्थापक निलम आंधळे यांच्यासह उपाध्यक्ष विद्या मोहिते आणि जयदादा डिगोळे यांची विशेष उपस्थिती लाभली.

उपस्थित मान्यवरांनी महिलांना स्वावलंबन, आत्मविश्वास आणि कौशल्यविकासाचे महत्त्व सांगत अशा उपक्रमांमुळे महिलांच्या सृजनशीलतेला योग्य दिशा मिळते, असे मत व्यक्त केले. कार्यशाळेच्या माध्यमातून महिलांना घरबसल्या रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊ शकतात, तसेच त्यांच्या कलागुणांना व्यासपीठ मिळावे, या उद्देशाने दिशा महिला मंच सातत्याने विविध उपक्रम राबवत असल्याचे या वेळी सांगण्यात आले.

कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनाबद्दल सहभागी महिलांनी दिशा महिला मंचचे आणि प्रशिक्षिका भावना सरदेसाई यांचे मनःपूर्वक आभार मानले. भविष्यातही अशा उपयुक्त व प्रेरणादायी कार्यशाळांचे आयोजन करण्यात यावे, अशी अपेक्षा महिलांनी व्यक्त केली.

# बचत गटांच्या उत्पादनासाठी दोन दिवसीय मार्केट उपलब्ध

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान DAY ANULM बचत गटांच्या महिलांनी तयार केलेल्या मालाला १५ आणि १६ डिसेंबर २०२५ रोजी मार्केट उपलब्ध करून देण्यात आला. लोकपरिषद संस्थेच्या वतीने तृतीय पंथीयांच्या बचत गटांना संधी देण्यात आली. या एक्सिबिशनमध्ये निर्भया किन्नर बचत गट आणि अधिकार किन्नर बचत गट यांच्या वतीने घरगुती मसाले स्टॉल लावण्यात आले होते.



समाजाच्या मुख्य प्रवाहातून वंचित राहिलेल्या तृतीय पंथी व्यक्तींना रोजगाराच्या संधी मिळाव्यात, त्यांचा आत्मसन्मान वाढावा आणि आर्थिक स्वावलंबन साध्य व्हावे या उद्देशाने अशोका मसालेची सुरुवात करण्यात आली. येथे गुणवत्ता, पारदर्शकता आणि परंपरा यांना सर्वोच्च प्राधान्य दिले जाते. या उपक्रमातून रोजगार निर्मिती, कौशल्य विकास, आत्मनिर्भरता, समाजात सन्मानाने जगण्याची संधी मिळाली.

# फुंडे येथे विद्यार्थिनींसाठी समुपदेशन कार्यशाळा



**उरण : वार्ताहर, प्रतिनिधी**

फुंडे येथील तुकाराम हरी वाजेकर विद्यालयात ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थिनींसाठी मुली वयात येताना या विषयावर समुपदेशन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. ही कार्यशाळा विद्यालयाचे प्राचार्य बबन साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली झाली.

कार्यशाळेत गव्हाण येथील प्राध्यापिका करुणा तांडेल व तेजल खेडेकर यांनी विद्यार्थिनींना वयात येताना होणारे मानसिक, शारीरिक तसेच भावनिक बदल याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

कार्यशाळेचे नियोजन उपमुख्याध्यापिका संगीता थोरात, रयत सेवक को-ऑप. बँकेचे संचालक प्रा. किशोर पाटील, ज्युनिअर कॉलेज विभाग प्रमुख प्रा. बाबुलाल पाटोळे , प्रा. राजू खेडकर व प्रा. दीपक शेडगे यांनी केले. कार्यक्रमास विद्यार्थिनींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

# ध्येय ठेवा, जीवन सुखी होईल -आर.के. म्हात्रे

**चिरनेर : प्रतिनिधी**

जीवन सुखी व्हायचं असेल तर विद्यार्थ्यांनी आपल्या डोळ्या समोर ध्येय ठेवायला हवीत. असा उपदेश नेरे महाविद्यालयाचे माजी प्राचार्य आर. के. म्हात्रे यांनी दिला. आवरे येथील रामचंद्र म्हात्रे विद्यालयात महाकवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी म्हात्रे यांनी हा उपदेश आपल्या मार्गदर्शनपर भाषणात दिला.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान साहित्यरत्न तथा रायगड भूषण प्रा. एल बी पाटील यांनी भूषविले होते. कार्यक्रमाच्या अनुषंगाने प्राचार्य सुभाष ठाकूर यांनी उपस्थित मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. प्रास्ताविक गावंड यांनी केले. त्यानंतर कवी संमेलनाला सुरुवात झाली. यात लवेंद्र मोकल, रामचंद्र म्हात्रे, अक्षता गोसावी, केशव म्हात्रे, संजय केणी, प्रवीण चिर्लेकर, शिवप्रताप पंडित, नरेश पाटील, संजीव पाटील, रंजना केणी, एल. बी. पाटील या सर्वांनी उत्स्फूर्त अशा दर्जेदार कवितांचे सादरीकरण करून उपस्थित विद्यार्थी व शिक्षक वर्गाला मोठा आनंद दिला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रसिद्ध निवेदिका तथा शिक्षिका रंजना केणी व प्रा. प्रवीण चिर्लेकर यांनी केले.

# दिघोडे येथे तलावाच्या सुशोभीकरणाचे भूमिपूजन



**उरण : प्रतिनिधी**

गेली अनेक वर्ष बांधकाम, दुरुस्ती व मजबुतीकरण तसेच सुशोभीकरणाच्या प्रतिक्षेत असलेल्या दिघोडे येथील तलावाच्या बांधकाम, मजबुतीकरण व सुशोभीकरणाच्या नियोजित कामाचे भूमिपूजन मंगळवारी दिघोडे येथे पार पाडण्यात आले. उद्योगपती पी. पी. खारपाटील यांच्या हस्ते तलावाच्या बांधकामाचे उद्घाटन करण्यात आले.

या तलावाच्या सुशुभिकरणाचे काम पी.पी. खारपाटील कंट्रक्शन अँड कंपनीच्या वतीने करण्यात येणार आहे. या वेळी पी.पी. खारपाटील कंट्रक्शन कंपनीचे सहव्यवस्थापकीय संचालक राजेंद्र खारपाटील, दिघोडे ग्रामपंचायतीचे सरपंच किर्तीनिधी ठाकूर, उपसरपंच कैलास म्हात्रे, माजी सरपंच अविनाश पाटील, माजी सरपंच पांडुरंग कोळी, माजी उपसरपंच अभिजित पाटील, ग्रामपंचायतीचे सदस्य संदेश पाटील, अलंकार कोळी, उज्वला म्हात्रे, अपेक्षा कासकर, अपेक्षा पाटील, आरती कोळी, रेखा कोळी, मत्स्यगंधा पाटील, माजी सरपंच एकनाथ माळी, महादेव पाटील, श्रावण घरत, गणेश पाटील, कैलास पाटील, वर्षाकेतू ठाकूर, एकनाथ घरत, कमलाकर कोळी, कैलास पाटील, अविनाश म्हात्रे, प्रफुल्ल पाटील, सुरेश पाटील, पांडुरंग कासकर, वरूण पाटील, समाधान पाटील, रमेश कोळी आदी उपस्थित होते.

# पनवेल तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात वाकडी येथील आश्रमशाळेचा प्रथम क्रमांक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल पंचायत समिती शिक्षण विभाग, पनवेल गणित विज्ञान अध्यापक मंडळ आणि रयत शिक्षण संस्थेचे लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मिडीयम स्कूल व ज्युनिअर कॉलेज कामोठे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ५३वे पनवेल तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनामध्ये कुष्ठरोग निवारण समिती शांतीवन संचालित श्री अण्णासाहेब सहस्त्रबुध्दे अनुदानित माध्यमिक आश्रमशाळा वाकडीने प्रथम क्रमांक पटकावला आहे.

शाळेने सोलर प्लॅनेट खालील रिकाम्या जागेत शाश्वत शेती हा प्रकल्प तयार करून सादर केला. माध्यमिक शिक्षक गावीत डी एच यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थिनी कू अलीशा गडखल आणि कू रोहिणी वाघमारे यांनी या प्रकल्पाची मांडणी केली.



या यशामागे शाळेच्या मुख्याध्यापिका, शिक्षक-शिक्षकेतर वृंद आणि संस्थाप्रमुख यांचे योगदान लाभले आहे. या सर्वांचे सर्वत्र कौतुक केले जात आहे.

# माणगावात साहित्यविषयक राष्ट्रीय परिषद



**माणगाव : प्रतिनिधी**

प्रधानमंत्री उच्चतर शिक्षण अभियान (पीएम-उषा), महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य अकादमी, मुंबई आणि द. ग. तटकरे महाविद्यालय, माणगाव-रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'आधुनिक हिंदी साहित्यातील मूल्यविमर्श : परंपरा, परिवर्तन आणि आव्हाने' या विषयावरील एकदिवसीय राष्ट्रीय परिषद शनिवार, १३ डिसेंबर २०२५ रोजी उत्साहात आणि यशस्वीरीत्या पार पडली.

परिषदेचे अध्यक्षस्थान माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे पदाधिकारी श्री. नितीन बामगुडे यांनी भूषविले. प्रो. डॉ. अनिल सिंह (अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा, मुंबई विद्यापीठ) प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. बीज वक्तव्य बलभीम महाविद्यालय, बीड येथील हिंदी विभागप्रमुख प्रो. बाबासाहेब कोकाटे यांनी केले. उद्घाटक म्हणून प्रो. एस. ए. मंजूनाथ, तर स्वागताध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. एम. खामकर उपस्थित होते.

या राष्ट्रीय परिषदेत देशातील पाच राज्यांतील विविध महाविद्यालयांमधील ७१ हिंदी प्राध्यापक, १२ संशोधक विद्यार्थी आणि ६० विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग नोंदविला. परिषदेत आधुनिक हिंदी साहित्याच्या बदलत्या प्रवाहांवर, मूल्यसंस्थांवर आणि समकालीन सामाजिक-सांस्कृतिक आव्हानांवर सखोल व अभ्यासपूर्ण मंथन झाले. विविध सत्रांमध्ये नामवंत अभ्यासकांनी आपले विचार मांडत समृद्ध चर्चा घडवून आणली.

परिषदेचे मार्गदर्शन डॉ. किरण कुलकर्णी, सचिन निंबालकर, ॲड. राजीव अशोक साबळे, डॉ. शीतला प्रसाद दुबे, प्रो. संतोष मोटवानी यांनी केले. सत्राध्यक्ष म्हणून प्रो. मोहसिन खान, प्रो. सुरेश शेळके, प्रो. एस. ए. मंजूनाथ यांनी भूमिका पार पाडली. तसेच प्रो. युवराज मूल्ये, प्रो. संगीता चित्रकोटी, प्रो. ईश्वर पवार, डॉ. भारती, प्रो. मिलिंद साळवी, प्रो. सातप्पा लहू चौहान, डॉ. छाया जाधव, प्रो. एम. जी. इंगोले आदी मान्यवरांची उपस्थिती लाभली.

उद्घाटन सत्रात प्रो. डॉ. अनिल सिंह यांच्या संपादनाखाली प्रकाशित झालेल्या तीन नव्या पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले. या ग्रंथांच्या संपादक मंडळात सहसंपादक म्हणून प्रो. डॉ. संतोष मोटवानी, प्रो. डॉ. मोहसिन खान व डॉ. जयशंकर पांडेय यांचा समावेश आहे.

# काशीद ग्रामपंचायत प्रशासकपदाची स्वप्नील म्हात्रे यांच्याकडे सूत्रे

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यामधील काशीद ग्रामपंचायत सरपंच संतोष जयराम राणे, उपसरपंच सुमित रमेश कासार, ग्रामपंचायत सदस्य दीपेश दत्तात्रेय काते यांच सदस्यत्व रद्द करण्यात आले आहे. या संबंधीचा निकाल नुकताच रायगड जिल्हाधिकाऱ्यांनी जाहीर केला होता.

ग्रामपंचायत सरपंच संतोष राणे यांनी महाराष्ट्र शासनाची जागा बांधकामासहित नोटरी करून सुमारे १२ लाख रुपयांना विकली होती. तर उपसरपंच सुमित कासार यांनी समुद्रकिनारी अतिक्रमण करून स्टॉल बांधला होता. ग्रामपंचायत सदस्य दीपेश काते यांनी सरकारी जमिनीवर आईच्या नावाने स्टॉल बांधला होता. या तिघांविरोधात रायगड जिल्हाधिकारी यांनी निकाल देऊन त्यांना पदापासून दूर केले होते. लोकांची व विकासाची कामे थांबू नये यासाठी काशीद ग्रामपंचायत प्रशासक म्हणून पंचायत समिती विस्तार अधिकारी स्वप्नील म्हात्रे यांना सरपंच पदाचा पदभार म्हणजेच प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात आले आहे.



या पुढे काशीद ग्रामपंचायत मधील सर्व कारभार त्यांच्या मार्गदर्शनाखाली सपन्न होणार आहे. आज त्यांनी कार्यभार स्वीकारताच सर्व ग्रामपंचायत सदस्य व ग्रामपंचायत कर्मचारी त्यांचे पुष्पगुच्छ व शाल देऊन स्वागत केले.

# दिवील येथे आज श्रमसंस्कार शिबिर

**पोलादपूर : प्रतिनिधी**

शिवाई शिक्षण प्रसारक मंडळ, महाड संचलित पोलादपूर तालुक्यातील चोळई येथील सुंदरराव मोरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या विशेष श्रमसंस्कार शिबिराचे उद्घाटन तालुक्यातील दिवील या गावी गुरुवारी (दि.१८) सकाळी ११ वाजता होणार असल्याची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. सुनील बलखंडे व उपप्राचार्य डॉ.महेश वल्ले यांनी दिली आहे.

१८ डिसेंबर ते २४ डिसेंबर २०२५ या कालावधी दरम्यान संपन्न होणाऱ्या या शिबिराचे उदघाटन प्रिव्ही स्पेशालिटी केमिकल्स लिमिटेड, महाड या सुप्रसिध्द कंपनीचे सीनियर व्हाईस प्रेसिडेंट (एच. आर.आय.आर. ॲण्ड ॲडमिनिस्ट्रेशन) राम सुर्वे यांच्याहस्ते होणार आहे. या उदघाटन कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान शिवाई शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ॲड. संतोष काळे भूषविणार आहेत. या कार्यक्रमासाठी शिवाई शिक्षण संस्थेचे खजिनदार किशोर मोरे, तसेच महाविद्यालय विकास समितीचे सदस्य चंद्रकांत कळंबे, एकनाथ गायकवाड, दिलीप भागवत, अश्विनी गांधी तसेच दिवील गावचे सरपंच सागर देवे, उपसरपंच प्रमोद मोरे, सामाजिक कार्यकर्ते विक्रम भिलारे यांच्यासह ग्रामस्थ व्यवस्थापन समितीचे सर्व सदस्य उपस्थित राहणार आहेत.

युथ फॉर माय भारत आणि युथ फॉर डिजिटल लिटरसी या मध्यवर्ती संकल्पनेवर आधारित आयोजित केलेल्या या विशेष श्रमसंस्कार शिबिरामध्ये ग्रामसफाई, वनराई बंधारा, ग्रामस्थ आरोग्य तपासणी, अंधश्रध्दा निर्मूलन, ग्राम सर्वेक्षण यांच्यासह शिबिरार्थींसाठी विविध मान्यवरांच्या प्रबोधनपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये राजेश कदम (सर्वांगीण विकास), अपूर्वा देसाई, प्रा.स्नेहा काळे, गंगाधर साळवी (वाचन संस्कृतीतून वैचारिक विकास), प्रेमसागर मेस्त्री (पक्षी संवर्धन) पराग हेलेकर (व्यक्तिमत्व विकास) पोलीस अधिकारी जीवन माने व आनंद रावडे (कायदा सुव्यवस्था, सायबर सिक्युरिटी व डिजिटल लिटरसी) अशा अधिकाधिक महाड तालुक्यातील मान्यवरांद्वारे विविध विषयांबाबत शिबिरार्थी आणि ग्रामस्थांमध्ये जनजागृती करण्यात येणार आहे.

शिबिराचा समारोप बुधवार २४ डिसेंबर २०२५ रोजी दिवील येथे सकाळी दहा वाजता आयोजित करण्यात आला आहे. शिवाई शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष ॲड. विनोद देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होणाऱ्या या समारोप समारंभासाठी महाड विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी शंकर काळे हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. समारोपासाठी शिवाई शिक्षण संस्थेचे सचिव अशोकबंधू देशमुख हे सन्माननीय अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. या श्रमसंस्कार शिबिराच्या नियोजनासाठी राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रमाधिकारी व विभागीय समन्वयक डॉ. राम बरकुले, डॉ. शैलेश जाधव, डॉ. स्नेहल कांबळे, प्रा. संजय कसबे यांच्यासह महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विद्यार्थी व अन्य स्टाफ कार्यरत आहेत.

# माणगाव येथे रांगोळी प्रशिक्षण कार्यशाळा

**माणगाव : बातमीदार**

वनवासी कल्याण आश्रम शाळा माणगाव येथे १३ व १४ डिसेंबर रोजी रांगोळी प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन केले होते. या कार्यशाळेचे उद्घाटन नंदिनी नितीन बामगुडे (सभापती महिला, बालकल्याण व युवक कल्याण समिती) यांच्या हस्ते करण्यात आले. सोबत समितीच्या कार्यकर्त्या श्रीमती भारती महाळुंगे मॅडम होत्या. बामगुडे मॅडम यांनी विद्यार्थ्यांना खूप चांगले मार्गदर्शन केले.



या वेळी बोलताना त्या म्हणाल्या आम्हीही शाळा चालवतो पण आमच्या शाळेमध्ये हे कार्यक्रम होत नाहीत. तुम्ही खूप नशीबवान विद्यार्थी आहात की तुम्हाला हे सर्व खूप चांगल्या प्रकारे शिकायला मिळते. तुम्ही यातून खूप चांगल्या प्रकारे शिका चांगल्या रांगोळ्या काढा आणि आपल्या घरी देखील गेल्यावर अशाच रांगोळ्या काढा. जी काही तुम्हाला मदत लागेल ते सांगा आम्ही ती तुम्हाला देण्यासाठी तयार आहोत. तसेच बामगुडे मॅडम यांनी मुला-मुलींसोबत रांगोळी काढण्याचा आनंद घेतला.

इयत्ता सहावी ते आठवीच्या २५ मुले व २५ मुली यांनी या प्रशिक्षणात सहभाग घेतला होता. हे रांगोळीचे प्रशिक्षण देण्यासाठी संस्कार भारतीच्या कार्यकर्त्या श्रीमती सुचिता चापनेरकर, प्रतिभाताई करंदीकर व सतीश थवे हे सर्व मुंबई येथून आले होते. शाळेचे दोन्ही मुख्याध्यापक उत्तम पाटील सर व अरुण पाटील सर उद्घाटनासाठी व दोन्ही दिवस कार्यशाळेसाठी उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वसतिगृह अधिक्षिका श्रीमती मीनाक्षी कांबळे मॅडम यांनी केले.

दोन दिवसीय कार्यशाळेमध्ये चांगल्या रांगोळ्या काढण्याचा अनुभव मुलांनी घेतला. वेगवेगळ्या रांगोळ्या कशा काढतात हे त्यांना शिकता आले. हे शाळेचे रौप्य महोत्सवी वर्ष असल्या कारणास्तव शेवटी शाळेच्या रौप्य महोत्सवाची रांगोळी सर्वांनी मिळून सुंदर रांगोळी काढली. कार्यक्रमाच्या समारोपा वेळी मुला- मुलींनी स्वतःचे खूप चांगले अनुभव देखील व्यक्त केले. याप्रसंगी प्राथमिक विभागाच्या शिक्षिका श्रीमती प्रवीणा पाटील मॅडम यांनी सर्वांचे आभार मानले व पुढच्या वर्षी देखील आपण आमच्या विद्यार्थ्यांना शिकवण्यासाठी यावे अशी संस्कार भारतीच्या कार्यकर्त्यांना विनंती केली.

# सीकेटी विद्यालयात वार्षिक पारितोषिक वितरण सोहळा




**पनवेल : प्रतिनिधी**


पनवेल तालुक्यातील जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर (सीकेटी) विद्यालयाच्या इंग्रजी माध्यम प्राथमिक विभागातर्फे वार्षिक पारितोषिक वितरण सोहळा बुधवारी (दि.१७) झाला. या कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख पाहुणे पनवेल नगरीच्या माजी नगरसेविका राजश्री वावेकर, पालक प्रतिनिधी युवराज धनवटे आदी मान्यवरांच्या हस्ते प्रतिमापूजन, दीपप्रज्वलन करून करण्यात आले.

या वेळी, शाळेच्या मुख्याध्यापिका निलिमा शिंदे यांनी मान्यवरांचे शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. दरम्यान, उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पनवेल तालुक्यातील चांगू काना ठाकूर विद्यालय इंग्रजी माध्यम प्राथमिक विभागाच्या वतीने शाळांतर्गत वर्षभरात घेण्यात येणाऱ्या विविध स्पर्धा, तसेच तालुका, जिल्हा, विभाग, राष्ट्रीय स्तरातील कला व सांस्कृतिक कार्यक्रमात यश मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र, मेडल देऊन गौरविण्यात आले.

दरम्यान, शाळेच्या मुख्याध्यापिका निलिमा शिंदे यांनी आपल्या भाषणातून विद्यार्थ्यांना महत्त्वपूर्ण मार्गदर्शन करत त्या पुढे म्हणाल्या की, यश मिळविण्यासाठी स्पर्धेमध्ये सहभागी होणे गरजेचे असते. जरी पराभव झाला तरी, खचून न जाता पुन्हा त्याच उत्साहात प्रयत्न करत राहणे हा मोलाचा संदेश देत कौतुक केले.

कार्यक्रमादरम्यान दुर्वा मयूर भोसले ह्या इयत्ता चौथीच्या विद्यार्थिनी आपल्या सुमधुर सुरांनी गुरुवर्य रूपेश मढवी व संतोष खरे यांच्या मार्गदर्शनाखाली सुंदर गीताचे सादरीकरण कले. तसेच अन्वयी धुमाळ व संहिता जाधव या विद्यार्थीनीने आपल्या एकेरी नृत्याच्या सादरीकरणाने सर्वांना मंत्रमुग्ध केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन जसप्रीत कौर सग्गु व योगिनी माने यांनी केले.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे माजी नगरसेविका राजश्री वावेकर, पालक संघाचे प्रतीनिधी युवराज धनवटे, इंग्रजी माध्यम माध्यमिक विभागाच्या पर्यवेक्षिका नीरजा अधुरी, इंग्रजी माध्यम पूर्व प्राथमिक विभागाच्या पर्यवेक्षिका वैशाली पारधी तसेच इंग्रजी माध्यम पूर्व प्राथमिक व प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका निलिमा शिंदे उपस्थित होत्या.





**नागोठणे : राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेतृत्व ध्रुव सोष्टे यांना वाढदिवसानिमित्त मंत्री अदिती तटकरे, राष्ट्रवादीचे नेते भाई टके, नागोठणे विभाग अध्यक्ष संतोष कोळी, पत्रकार शामकांत नेरपगार, मनोज टके, चेतन टके, पंकज टके, अंकुश ताडकर, ज्ञानेश्वर दळवी आदींनी शुभेच्छा दिल्या.**

## थंडी वाढली

**अलिबाग :** गेल्या चार दिवसांपासून मोठ्या प्रमाणात हवेत धुके व गारवा सुरू झाल्याने थंडी वाढत आहे. वातावरणात गारवा जाणवत आहे.


**PUBLIC NOTICE**

Notice is hereby given to the public at large that the **Original Allotment Letter bearing Serial No. सिडको/बी.यु.डी.पी./५९०/५७२४७ , dated 03/01/1996,** pertaining to the property **Room No 11, Pratik Co-operative Housing Society Ltd., Plot No B/48, Sector 12, Kharghar 410210,** originally issued in the name of **Mr. Chandrakant Kashinath Jadhav,** has been misplaced / lost and is not traceable despite diligent search.

It is hereby clarified that **Mrs. Yogita Bhagwan Patil** and **Mr. Rishikesh Bhagwan Patil** are the present owners of the above-mentioned property, having lawfully acquired all right, title, and interest therein. The said lost Allotment Letter has not been mortgaged, pledged, or deposited with any person, bank, financial institution, or authority. No person has any right, title, interest, claim, or objection whatsoever in respect of the said lost Allotment Letter or the above-mentioned property.

Any person claiming to have found the said document or having any claim, right, or objection in respect thereof is hereby required to contact the undersigned at the address mentioned below within **15 (fifteen) days** from the date of publication of this notice. In the event no claim or objection is received within the stipulated period, it shall be presumed that no such claim exists, and my clients shall be free to apply for issuance of a duplicate Allotment Letter and/or take such further steps as may be necessary.

**Date: 18/12/2025**

**sd/-**
**Adv. Aditya R Katakdound**
**Kharghar cha Raja Ganesh Temple (Basement), Sectoor 12, Kharghar, Navi Mumbai 410210**


# वाहतुकीचे नियम मोडणाऱ्या चालकांना दंड

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्ह्यात पर्यटनस्थळे जास्त प्रमाणात असल्याने येथे पर्यटक अधिक संख्येने येत असतात. त्याचा वाहतूकीवरही परिणाम होतो. त्यामुळे वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करून बेदरकारपणे वाहने चालविणाऱ्या वाहनचालकांवर वाहतूक पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे.

जिल्ह्यातील २८ पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतूक शाखेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मंगळवारी (दि.१६) वाहतुकीचे नियम भंग करणाऱ्या एकूण २५५ वाहनचालकांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली. पोलिसांनी या वाहनचालकांकडून दोन लाख ५८ हजार ३०० रुपये इतका दंड आकारला आहे. वाहतूक पोलिसांच्या या सुरू असलेल्या धडक कारवाईमुळे वाहनचालकांचे धाबे दणाणले आहेत.


**PUBLIC NOTICE**

Notice is hereby given to the public at large that the **Original Allotment Letter bearing Serial No. सिडको/ बी.यु.डी.पी./व प्रसअ/ ३५/०१०१८२७, dated - 03/01/1996,** pertaining to the property **Room No. 12, Pratik CHS, Plot No. B/48, Sector 12, Kharghar 410210,** originally issued in the name of **HAUSHA BAPU MAHADEV SARGAR,** has been misplaced/lost and is not traceable despite diligent search.

It is hereby clarified that **Mr. UMAKANT BHAGWAN PATIL** is the present owner of the above-mentioned property, having lawfully acquired right, title, and interest therein. The said lost Allotment Letter is not mortgaged, pledged, or deposited with any person, bank, financial institution, or authority. No person has any right, title, interest, claim, or objection whatsoever in respect of the said lost Allotment Letter or the above-mentioned property.

Any person claiming to have found the said document or having any claim, right, or objection in respect thereof is hereby required to contact the undersigned at the address mentioned below within **15 (fifteen) days** from the date of publication of this notice. In the event no claim or objection is received within the stipulated period, it shall be presumed that no such claim exists, and my client shall be free to apply for issuance of a duplicate Allotment Letter and/or take such further steps as may be necessary.

**Date: 18/12/2025**

**sd/-**
**Adv. Aditya R Katakdound**
**Kharghar cha Raja Ganesh Temple (Basement), Sectoor 12, Kharghar, Navi Mumbai 410210**


# माजी विद्यार्थ्यांकडून सर एस.एस. हायस्कूलला वॉटर प्युरिफायर भेट



**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूडच्या जंजिरा विद्या मंडळाच्या सर एस.ए. हायस्कूलमधील जुनी अकरावी एसएससी बॅच १९७५ (जुना अभ्यासक्रम)घ्या विद्यार्थ्यांकडून बुधवारी विद्यालयाला जलशुद्धीकरण यंत्र अर्थात वॉटर प्युरिफायर भेट देण्यात आला. या वॉटर प्युरिफायरचे उदघाटन सचिव उल्हास चौलकर यांनी श्रीफळ वाढवून व फीत कापून केले.

या वेळी जंजिरा विद्यामंडळाच्या उपाध्यक्षा प्रतिभा जोशी, संचालक मंडळाचे सदस्य उदय दांडेकर, हायस्कूलचे पर्यवेक्षक भास्कर मोरे,माजी मुख्याध्यापक तथा सदर बॅचमधील एक विद्यार्थी उदय गद्रे, मोहन पाटील, गणेश सुकाळे, उदय खोत, उदय चौलकर, पांडुरंग आगरकर, दिप्ती दांडेकर आदी उपस्थित होते. उदय गद्रे यांनी शाळेसह सर्व उपस्थितांचे आभार मानले.

# रोहित काळे यांना रायगड रत्न पुरस्कार

**नागोठणे : बातमीदार**

ग्रामीण भागातील होतकरू क्रिकेटपटूंना जिल्हा व राज्य पातळीपर्यंत घडवण्यासाठी सातत्याने कार्यरत असलेले क्रिकेट कोच रोहित सूर्यकांत काळे यांना त्यांच्या उल्लेखनीय योगदानाबद्दल 'रायगड रत्न' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा सन्मान १४ डिसेंबर २०२५ रोजी डॉ. अजय मोरे यांच्या आयोजनाखाली झालेल्या कोकण फेस्टिवल २०२५ या भव्य कार्यक्रमात ज्येष्ठ अभिनेते जयराज नायर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.



ग्रामीण भागातील मर्यादित साधनसंपत्ती असूनही, काळे सरांनी शिस्तबद्ध प्रशिक्षण, योग्य मार्गदर्शन आणि खेळाडूंमधील आत्मविश्वास वाढवण्यावर भर देत अनेक खेळाडूंना जिल्हास्तरीय स्पर्धांपर्यंत पोहोचवले आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली घडलेल्या खेळाडूंनी विविध स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करत तालुक्याचे तसेच जिल्ह्याचे नाव उज्वल केले आहे. कोकण फेस्टिवल २०२५ दरम्यान विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत हा सन्मान सोहळा उत्साहात पार पडला.

# नवख्या खेळाडूंची कोटीच्या कोटी उड्डाणे!

## आयपीएल लिलावात चांगली किंमत; मैदान गाजवण्याची संधी

**मुंबई : प्रतिनिधी**

इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) ट्वेन्टी-२० क्रिकेटमध्ये मंगळवारी झालेल्या छोटेखानी लिलावात उदयोन्मुख (अनकॅप्ड) अर्थात भारतासाठी अद्याप न खेळलेल्या खेळाडूंना चांगलाच 'भाव' मिळाला. चेन्नई सुपर किंग्ज उदयोन्मुख खेळाडूंना संघात स्थान देण्यात अग्रेसर ठरले. त्यांनी राजस्थानचा यष्टिरक्षक-फलंदाज कार्तिक शर्मा आणि उत्तर प्रदेशचा अष्टपैलू प्रशांत वीर यांना समान १४.२० कोटी रुपयांच्या रकमेसह संघात स्थान दिले. उदयोन्मुख खेळाडूंसाठीची ही आजवरची विक्रमी बोली ठरली.




यंदाच्या आयपीएल लिलावातील सर्वाधिक बोली ऑस्ट्रेलियाच्या कॅमरून ग्रीनवर लागली. त्याला २५.२० कोटी रुपयांना कोलकाता नाइट रायडर्सने आपल्या ताफ्यात घेतले. तो आजवरच्या आयपीएल इतिहासातील सर्वांत महागडा परदेशी खेळाडू ठरला.

प्रशांत आणि कार्तिक यांच्यासह अकिब नबी दार (८.४० कोटी, दिल्ली कॅपिटल्स), मंगेश यादव (५.२० कोटी, रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू), तेजस्वी सिंह दहिया (३ कोटी, कोलकाता नाइट रायडर्स), अक्षत रघुवंशी (२.२० कोटी, लखनऊ सुपर जायंट्स), सलील अरोरा (१.५० कोटी, सनरायजर्स हैदराबाद) या उदयोन्मुख खेळाडूंनाही मोठी रक्कम मिळाली.

जम्मू आणि काश्मीरचा वेगवान गोलंदाज अकिब दार याने आयपीएल २०२६च्या मिनी लिलावात बाजी मारली. त्याला दिल्ली कॅपिटल्स संघाने तब्बल ८.४० कोटी रुपयांना विकत घेतले आहे. केवळ ३० लाख रुपयांच्या मूळ किमतीपासून सुरुवात करत त्याने ८.४० कोटींपर्यंत मजल मारली.

आयपीएलच्या मागील दोन हंगामात न दिसलेला आणि अबू धाबीच्या मिनी लिलावात पहिल्या सेटमध्ये अनसोल्ड राहिलेल्या सरफराज खानला चेन्नई सुपर किंग्जच्या संघाने मोठा दिलासा दिला आहे. अनसोल्ड राहिलेल्या सरफराजवर सीएसकेने दुसऱ्या फेरीत बोली लावली. मुंबईकराला ७५ लाख या मूळ किमतीसह सीएसकेने आपल्या संघात दाखल करून घेतले. २०१५च्या हंगामात आयपीएल पदार्पण करणारा सरफराज २०२३नंतर पुन्हा या स्पर्धेत खेळताना दिसणार आहे.

# ऐरोलीत मॅरेथॉनला उत्तम प्रतिसाद

**नवी मुंबई : बातमीदार**

ऐरोली स्पोर्ट्स असोसिएशन (एसएए)ने आयोजित लिव्हफिट पुरस्कृत ग्रीनॅथॉन (मॅरेथॉन) स्पर्धा नुकतीच आयोजित करण्यात आली. या स्पर्धेत नवी मुंबई, ठाणे, कल्याण, डोंबिवली, मुंबई आणि महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमधून आलेल्या २३०० धावपटूंनी भाग घेतला होता.

स्पर्धा तीन किमी (ग्रीन फन रन), पाच किमी (ग्रीन स्पिरिट रन), १० किमी (ग्रीन स्ट्राईड रन) आणि २१ किमी (हाफ ग्रीनॅथॉन, ग्रीन चॅलेंजर) या चार श्रेणींमध्ये झाली. प्रत्येक सहभागी स्पर्धकाला टी-शर्ट, पदक, ई-प्रमाणपत्र आणि गुडी बॅग देण्यात आली, तर विजेत्यांना रोख बक्षीस देण्यात आले.

या स्पर्धेत प्रत्येक सहभागी झालेल्या धावपटूंच्या नावे झाडे लावण्यात येणार आहेत. ही वृक्षारोपण मोहीम पावसाळ्यात राबविण्यात येईल. हा उपक्रम




गेल्या पाच वर्षांपासून एएसएमार्फत करीत करण्यात येत आहे.

पुरस्कार वितरण समारंभास ऑलिंपियन आणि एएसए सदस्य सुमा शिरूर, सायबर क्राइम ब्रांच, एसीपी प्रदीप तिदार, बँक ऑफ बडोदाचे नवी मुंबई प्रादेशिक व्यवस्थापक मनीष सिन्हा, केडीए हॉस्पिटलचे सीईओ डॉ. शशिकांत पवार, इंडसइंड बँकेचे झोनल हेड सौरभ मुझुमदार, इंडियन बँक हेड भुवनेश्वरी गणेशन, बंधन बँक प्रादेशिक प्रमुख अनिकेत बोडस, बब्या विज्ञापनच्या वर्षा मेहता यांच्यासह ऐरोलीतील विविध शाळांचे मुख्याध्यापक तसेच स्पर्धेचे प्रायोजक व त्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# आगरी सेवा संघाची हटके कबड्डी स्पर्धा

## विजेते, उपविजेत्यांना बोकड अन् कोंबडी बक्षीस

**मुंबई : प्रतिनिधी**

आगरी सेवा संघ, मुंबईच्या वतीने मुंबई शहर कबड्डी असोसिएशनच्या मान्यतेने १८ ते २१ डिसेंबर या कालावधीत पुरुष द्वितीय श्रेणी गट कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. श्री साई विरुद्ध अमर सुभाष या सामन्याने या रंगतदार धूमशानला सुरुवात होईल.



प्रभादेवी येथील राजाराम साळवी उद्यानातील स्व. दि.बा. पाटील क्रीडानगरीत होणाऱ्या या स्पर्धेत १६ संघांनी आपला सहभाग नोंदविला आहे. सायंकाळी ६ ते १० या वेळेत प्रखर विद्युतझोतात सामने खेळविण्यात येतील. स्पर्धेत विजयी होणाऱ्या संघाला आगरी चषक व रोख रकमेबरोबरच त्यांच्या नेहमीच्या प्रथेप्रमाणे बोकड बक्षीसादाखल देण्यात येईल. उपविजयी संघालादेखील चषक व रोख रकमेसोबत कोंबडी बहाल करण्यात येईल.

दोन्ही उपांत्य संघांना चषक व रोख रक्कम देऊन सन्मानित करण्यात येईल. त्याचबरोबर स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडू, उत्कृष्ट पकड, चढाईपटूंचाही यथोचित सन्मान करण्यात येईल, अशी माहिती सचिव सुभाष ठाकूर यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली. अधिक माहितीकरिता चंद्रकांत पाटील (९९२०७३८४२९) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

एमसीए निमंत्रित क्रिकेट स्पर्धा

# साताऱ्याचा बीडवर २४ धावांनी विजय

**अलिबाग : प्रतिनिधी**

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या (एमसीए) १९ वर्षांखालील मुलांच्या निमंत्रितांच्या क्रिकेट स्पर्धेत सातारा संघाने बीड संघाचा २४ धावांनी पराभव केला.

सातारा विरुद्ध बीड हा सामना शिवाजीनगर गव्हाण येथील छत्रपती शिवाजी महाराज मैदानावर खेळला गेला. सातारा संघाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाज करताना पहिल्या डावात सर्व गडी गमवून २०१ धावा केल्या होत्या. बीड संघाने पहिल्या डावात २२१ धावा करून २० धावांची आघाडी घेतली. सातारा संघाने दुसऱ्या डावात सर्व गडी बाद १०६ केल्या. सामना जिंकण्यासाठी बीड



संघाला दुसऱ्या डावात ४१ षटकांमध्ये ८७ धावा करायच्या होत्या, परंतु सातारा संघाचे ईशान जोशी (चार बळी) व श्रावण खाडे (पाच बळी) यांनी भेदक गोलंदाजी करून बीडचा दुसरा डाव अवघ्या ६२ धावांमध्ये गुंडाळून आपल्या संघाला २४ धावांनी निर्णायक विजय मिळवून दिला.

सामन्यासाठी प्रमुख अतिथी म्हणून छत्रपती शिवाजी महाराज क्रिकेट अकॅडमीचे अध्यक्ष अमित कडू, सुजित ठाकूर, सुदेश ठाकूर, रोशन ठाकूर, आरडीसीए उपाध्यक्ष राजेश पाटील उपस्थित होते. सामनाधिकारी म्हणून चंद्रकांत म्हात्रे, ॲड.पंकज पंडित व सनी म्हात्रे यांनी काम पाहिले.

सातारा संघाचे प्रशिक्षक हेमंत गुजर यांनी विजयाचे सर्व श्रेय आपल्या खेळाडूंनी मैदानावर घेतलेल्या मेहनतीला दिले आहे. संघातील सर्व गोलंदाजांनी सुरेख गोलंदाजी करत हरलेला सामना जिंकला, असे गुजर म्हणाले.

# प्रकृती बिघडल्याने यशस्वी जैस्वाल रुग्णालयात

**पुणे : प्रतिनिधी**

टीम इंडियाचा सलामीवीर यशस्वी जैस्वाल याची प्रकृती बिघडली असून त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. डॉक्टरांनी त्याला तीव्र गॅस्ट्रोएन्टेरायटिस झाल्याची पुष्टी केली. अल्ट्रासाऊंड व सीटी स्कॅन केल्यानंतर त्याला औषधे सुरू ठेवण्याचा आणि पुरेशी विश्रांती घेण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

वृत्तानुसार सय्यद मुश्ताक अली ट्रॉफी सुपर लीगमध्ये मंगळवारी मुंबईचा राजस्थानविरुद्ध सामना झाला. मुंबईकडून खेळताना यशस्वीने १६ चेंडूत १५ धावा केल्या. मुंबईने राजस्थानला २१७ धावांचे लक्ष्य देत हा सामना तीन गडी राखून जिंकला, मात्र या सामन्यावेळीच जैस्वालच्या पोटात दुखू लागले. सामन्यानंतर त्रास वाढल्याने त्याला तत्काळ पिंपरी-चिंचवड येथील आदित्य बिर्ला रुग्णालयात नेण्यात आले, जिथे डॉक्टरांनी त्याला तीव्र अतिसार (जुलाब) झाल्याची पुष्टी केली.

जैस्वालचे अल्ट्रासाऊंड व सीटी स्कॅन करण्यात आले. त्यानंतर त्याला औषधे सुरू ठेवण्याचा आणि पुरेशी विश्रांती घेण्याचा सल्ला देण्यात आला आहे. बीसीसीआयने अद्याप त्याच्या प्रकृतीबद्दल अधिकृत माहिती दिलेली नाही, परंतु येत्या काही दिवसांत याबाबत अधिक स्पष्टता अपेक्षित आहे.

# भारताची मलेशियावर ३१५ धावांनी मात

## अंडर-१९ आशिया चषकात अभिज्ञान कुंडूचे द्विशतक

**दुबई : वृत्तसंस्था**

भारतीय युवा क्रिकेट संघाने मंगळवारी (१६ डिसेंबर) आयसीसी अंडर-१९ आशिया चषक स्पर्धेतील साखळी सामन्यात मलेशिया संघाचा ३१५ धावांनी अक्षरशः धुव्वा उडवला. भारतासाठी हा युवा एकदिवसीय क्रिकेटमधील धावांच्या फरकाने मिळवलेला दुसरा सर्वात मोठा विजय ठरला.

भारताच्या या विशाल विजयाचा शिल्पकार ठरला तो यष्टिरक्षक-फलंदाज अभिज्ञान कुंडू, ज्याने वादळी द्विशतक झळकावले. अशी कामगिरी करणारा तो पहिला भारतीय युवा फलंदाज ठरला. कुंडूने १२५ चेंडूंमध्ये नाबाद २०९ धावांची ऐतिहासिक खेळी केली. या उत्कृष्ट कामगिरीसाठी त्याला 'सामनावीर' म्हणून गौरवण्यात आले.



सलामीवीर वैभव सूर्यवंशी याने २६ चेंडूंमध्ये तीन षटकार आणि पाच चौकारांच्या मदतीने वेगवान ५० धावा करून संघाला आक्रमक सुरुवात करून दिली, तर वेदांत त्रिवेदीने १०६ चेंडूंमध्ये सात चौकारांसह ९० धावांची खेळी साकारत कुंडूला चांगली साथ दिली. भारताने प्रथम फलंदाजी करताना निर्धारित ५० षटकांत सात गडी गमावून ४०८ धावांचा डोंगर उभा केला.

४०९ धावांच्या मोठ्या लक्ष्याचा पाठलाग करताना मलेशियाचा युवा संघ सुरुवातीपासूनच दबावाखाली दिसला. त्यांचा डाव केवळ ३२.१ षटकांत ९३ धावांवर आटोपला. भारताच्या दीपांश देवेंद्रनने आपल्या भेदक गोलंदाजीने मलेशियाच्या फलंदाजीचे कंबरडे मोडले. त्याने सात षटकांत २२ धावा देत पाच बळी घेतले. उद्धव मोहन यानेही दोन गडी बाद केले.

भारतीय १९ वर्षांखालील संघाने गट 'अ'मध्ये तिन्ही सामने जिंकून अव्वल स्थान पटकावले आहे आणि ते थेट उपांत्य फेरीसाठी पात्र ठरले आहेत.

# पृथ्वी शॉ पुन्हा दिल्ली कॅपिटल्सकडे

**मुंबई : प्रतिनिधी**

सतत वादाच्या भोवऱ्यात अडकणारा अन् आपल्या सोशल मीडिया पोस्टमुळे चर्चेत असणाऱ्या पृथ्वी शॉला आयपीएल २०२६च्या लिलावात मुख्य लिलावावेळी कोणी खरेदी केले नाही. तो मुख्य लिलाव राऊंड्समध्ये अनसोल्डच राहिला होता, पण थोड्याच वेळात त्याचे नशीब पालटले.

पृथ्वी शॉची बेस प्राईस ही ७५ लाख रुपये होती. मुख्य लिलाव राऊंड्समध्ये अनसोल्ड राहिल्यानंतर त्याने सोशल मीडियावर ब्रोकन हार्टची इमोजी शेअर करत 'इट्स ओके' अशी पोस्ट केली, पण काही वेळातच जुन्या फ्रेंचायजीने त्याला हात दिला. एक्सलरेशन राऊंडमध्ये दिल्ली कॅपिटल्सने शॉला बेस प्राईसमध्ये आपल्या संघात दाखल करून घेतले.

विशेष म्हणजे २०१८ ते २०२४पर्यंत पृथ्वी शॉ हा दिल्ली कॅपिटल्सकडूनच खेळत होता. या घडामोडीनंतर त्याने आपली तुटक्या हृदयाची पोस्ट त्वरित



हटवली अन् आनंदाने डीसी वेलकम ग्राफिक शेअर करत 'बॅक टू माय फॅमिली' अशी पोस्ट केली.

२६ वर्षांचा पृथ्वी शॉ हा सध्या देशांतर्गत क्रिकेटमध्ये चांगली कामगिरी करत असून त्याने रणजी ट्रॉफीमध्ये इतिहासातील दुसरे सर्वात वेगवान द्विशतक ठोकले. त्याने १४१ चेंडूत आपले द्विशतक पूर्ण केले. रणजी ट्रॉफीच्या इतिहासात (प्लेट ग्रुपचे सामने सोडले तर) हे दुसरे सर्वात वेगवान द्विशतक ठरले. यापूर्वी रवी शास्त्री यांनी १९८४-८५च्या हंगामात बडोद्याविरूद्ध १२३ चेंडूत द्विशतक ठोकले होते.

# आशियाई स्पर्धेतील कांस्यपदक विजेता पॉवरलिफ्टर गणेश तोटेचे उत्स्फूर्त स्वागत

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

तुर्की येथे आशियाई पॉवरलिफ्टिंग इक्विप्ड स्पर्धा नुकतीच पार पडली. या स्पर्धेत रायगड-महाराष्ट्राचा खेळाडू गणेश पुष्पा संजय तोटे हा खेळाडू १०५ किलो वजनी गटात चांगली कामगिरी करीत कांस्यपदकाचा मानकरी ठरला. त्याचे मायदेशी परतल्यावर जोरदार स्वागत करण्यात आले.



पनवेल तालुक्यातील भिंगारी येथील रहिवासी असलेला आणि पुणे सासवडमधील वाघेरे महाविद्यालयाचा विद्यार्थी असलेला गणेश तोटे वडिलांचे निधन झाल्यानंतर तीन दिवसांनी आंतरराष्ट्रीय स्पर्धेला रवाना झाला आणि पदक प्राप्त करून त्याने वडिलांना अनोखी श्रद्धांजली वाहिली. एकूण ८१७.५ एवढे वजन स्कॉट, बेंचप्रेस, डेडलिफ्ट या प्रकारात गणेशाने उचलले. त्यामुळे त्याला स्कॉटमध्ये रौप्य पदक, बेंचप्रेस कांस्य व सर्व स्पर्धकात कांस्य अशी एकूण तीन पदके प्राप्त झाली. त्याने यशाचे श्रेय प्रशिक्षक विशाल मुळे आणि जिम संचालक प्रमोद पवार यांना दिले आहे.

याचबरोबर पॉवरलिफ्टिंग स्पोर्ट्स असोसिएशन रायगडच्या समस्त कार्यकारिणीने गणेशला स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या होत्या तसेच स्पर्धेच्या दिवशी आंतरराष्ट्रीय पंच, शिवछत्रपती पुरस्कारप्राप्त राज्य संघटनेचे सचिव संजय सरदेसाई यांचे मोलाचे मार्गदर्शन झाले. याबाबत त्याने कृतज्ञता व्यक्त केली.

गणेशच्या पदकप्राप्तीमुळे पॉवरलिफ्टिंग स्पोर्ट्स असोसिएशन रायगडचे कार्यकारिणी सदस्य संदीप कृष्णा पाटकर व सुभाष दगडू टेंबे यांनी त्याच्या घरी जाऊन आई पुष्पा तोटे, बहिण पल्लवी, भाऊ आकाश आणि आत्या संगीता पांदे यांच्या उपस्थितीत त्याला भेटवस्तू, गुच्छ देऊन गौरविले. याबद्दल गणेश तोटे याने समाधान व्यक्त केले.







# 'आरडीटीटीए'च्या पॅरा खेळाडूंनी पदके जिंकली

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र राज्य टेबल टेनिस असोसिएशन व ठाणे जिल्हा टेबल टेनिस असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पहिली महाराष्ट्र राज्य पॅरा रँकिंग टेबल टेनिस स्पर्धा २०२५ पलावा येथे झाली. या स्पर्धेत रायगड जिल्हा टेबल टेनिस असोसिएशन (आरडीटीटीए)च्या खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करीत पदके पटकाविली.

'आरडीटीटीए'चे गजानन परमार आणि प्रमोद कुमार यांनी सुवर्ण, तर शक्ती कुमार यांनी कांस्यपदक जिंकले. हे तिन्ही खेळाडू नवी मुंबई स्पोर्ट्स व सामाजिक विकास मंडळ, सिडको समाज मंदिर, नवीन पनवेल येथे टेबल टेनिस खेळाचे प्रशिक्षण घेतात. यशस्वी खेळाडूंचे आरडीटीटीए अध्यक्ष व राज्य क्रीडा पुरस्कार विजेते संजय कडू यांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# फिरकीपटू वरुण चक्रवर्तीची ऐतिहासिक कामगिरी

## बुमराहचा विक्रम मोडून रँकिंगमध्ये रचला नवा इतिहास

**दुबई : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट संघाचा 'मिस्ट्री स्पिनर' वरुण चक्रवर्ती सध्या आपल्या फिरकीच्या जादूने जागतिक क्रिकेटमध्ये खळबळ माजवत आहे. आयसीसीने नुकत्याच जाहीर केलेल्या ताज्या टी-२० क्रमवारीत वरुणने असा पराक्रम केला आहे, जो आजवर भारताच्या कोणत्याही गोलंदाजाला अगदी जसप्रीत बुमराहलाही जमलेला नाही.



वरुण चक्रवर्ती आता टी-२० क्रिकेटमध्ये जगातील नंबर-१ गोलंदाज तर आहेच, पण त्याने रेटिंग पॉइंट्सच्या बाबतीतही इतिहास रचला आहे. वरुणच्या खात्यात सध्या ८१८ रेटिंग पॉइंट्स जमा झाले आहेत. विशेष म्हणजे टी-२० क्रमवारीत ८०० रेटिंग पॉइंट्सचा टप्पा ओलांडणारा तो भारताचा पहिलाच फिरकी गोलंदाज ठरला आहे.

यापूर्वी हा विक्रम भारताचा स्टार वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहच्या नावावर होता. बुमराहने २०१७मध्ये ७८३ रेटिंग पॉइंट्स मिळवले होते. वरुणने आता बुमराहला मागे टाकले आहे.

द. आफ्रिकेविरुद्ध सुरू असलेल्या टी-२० मालिकेत वरुणची कामगिरी जबरदस्त राहिली आहे. तीन सामन्यांत त्याने आतापर्यंत सहा बळी मिळवले आहेत. तिसऱ्या टी-२० सामन्यात त्याने अवघ्या चार षटकांत ११ धावा देऊन दोन गडी बाद केले. सातत्यपूर्ण कामगिरी आणि किफायतशीर गोलंदाजीमुळे त्याच्या रेटिंगमध्ये मोठी वाढ झाली आहे.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com